। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक ११६ वा । रविवार दिनांक १२ जुलै २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

# दिलेला शब्द पाळला ! पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या पाठपुराव्याला यश

## साडे सांगवीच्या रस्ता- पुलासाठी २.९० कोटी रुपयांच्या कामास प्रशासकीय मान्यता



धाराशिव.दि.११ जुलै (जिमाका ) धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त साडे सांगवी गावाला भेट देऊन ग्रामस्थांना दिलेले आश्वासन अखेर प्रत्यक्षात उतरले आहे.पालकमंत्री तथा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राज्य शासनाने साडे सांगवी येथील रस्ता व पुलाच्या बांधकामासाठी २ कोटी ९० लक्ष ५८ हजार रुपये खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता दिली आहे. ग्रामविकास विभागाने १० जुलै २०२६ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित केला असून,साडे सांगवीच्या विकासाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

या निर्णयामागे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा निर्णायक ठरला.त्यांनी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांना पत्र पाठवून साडे सांगवी येथील प्रतिमा-१ ते भोगलगाव साडेसांगवी ते इजिमा -११ या ग्राममार्ग क्रमांक ८० वरील पुलाच्या बांधकामासाठी तातडीने निधी मंजूर करण्याची मागणी केली होती.

या पत्रात त्यांनी नमूद केले होते की, सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टीमुळे साडे सांगवी येथील रस्त्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सप्टेंबर २०२५ रोजी भेट देऊन पुलाच्या बांधकामासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही सुरू करण्याची सूचना केली.त्यानुसार बांधकाम विभाग,जिल्हा परिषद, धाराशिव यांनी २ कोटी ९० लक्ष रुपये खर्चाचा प्रस्ताव ग्रामविकास विभागाकडे सादर केला होता.या प्रस्तावाला तातडीने मंजुरी मिळावी, अशी विनंतीही पालकमंत्री सरनाईक यांनी संबंधित पत्राद्वारे केली होती.

अखेर त्यांच्या या पाठपुराव्याला यश मिळत शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.यासंदर्भात पालकमंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, साडे सांगवी गावाला भेट दिली तेव्हा अतिवृष्टीमुळे नागरिकांना होत असलेल्या हालअपेष्टा प्रत्यक्ष पाहिल्या. त्यावेळी ग्रामस्थांना रस्ता आणि पुलाचे काम प्राधान्याने करून देण्याचे आश्वासन दिले होते.आज शासनाच्या प्रशासकीय मान्यतेमुळे ते आश्वासन पूर्ण होत असल्याचा मला आनंद आहे.जनतेला दिलेला शब्द पाळणे हीच आमची कार्यपद्धती आहे.

श्री.सरनाईक पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देत आहे.

साडे सांगवीसह धाराशिव जिल्ह्यातील विकासकामांना आवश्यक निधी मिळावा यासाठी मी सातत्याने पाठपुरावा केला असून, पुढील काळातही जिल्ह्यातील प्रत्येक गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कटिबद्ध आहे.

या कामामुळे साडे सांगवीसह परिसरातील नागरिक,शेतकरी, विद्यार्थी आणि दैनंदिन प्रवाशांना वर्षभर सुरक्षित व अखंड वाहतुकीची सुविधा उपलब्ध होणार आहे.विशेषतः पावसाळ्यात वाहतुकीसमोरील अडथळे दूर होऊन ग्रामस्थांचा संपर्क अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार आहे.शासनाने दिलेल्या या मंजुरीबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिलेला शब्द प्रत्यक्ष कृतीत उतरवल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत.

## क्राईम न्युज

### अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अजय रा. पारधी गल्ली तेर ता. जि. धाराशिव ह.मु. टोल नाका येडशी ता. जि. धाराशिव हे दि १०.०७.२०२६ रोजी ००.१२ वा. सु. हॉटेल बमभोले टी हाउसच्या जुन्या लोखंडी टपरीवर येडशी टोल नाका येथे अंदाजे ४०,००० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १०००सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

तसेच आनंदनगर पोलीस ठाण अंतर्गत अनिता वय ३५ वर्षे, रा. रमाईनगर एमआयडीसी धाराशिव ता. जि. धाराशिव हे दि १०.०७.२०२६ रोजी १८.३० वा. सु. रमाईनगर एमआयडीसी धाराशिव येथे अंदाजे २,९०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १० सिलबंद बाटल्या व २५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

### जुगार विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- कळंब पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान कळंब पोलीसांनी दि.१०.०७.२०२६ रोजी कळंब पोलीस ठाणे हद्दीत २ ठिकाणी छापा टाकला. यावेळी खमर वय ४८ वर्षे, रा.मोहा ता. कळंब जि. धाराशिव हे १५.४५ वा. सु. मोहा येथील हॉटेल अमीन चे जवळ कल्याण मटका जुगाराचे साहित्य असा एकुण १,६४० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले कळंब पो. ठाणेच्या पथकास आढळले. तर मोसीन रा.गांधीनगर कळंब ता. कळंब जि. धाराशिव हे १७.४० वा. सु. परळी रोड प्रिय दर्शनी मल्टीस्टेट बॅकेसमोर मोकळ्या जागेत कल्याण मटका जुगाराचे साहित्य असा एकुण ७२० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले कळंब पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये कळंब पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

बेंबळी पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान बेंबळी पोलीसांनी दि.१०.०७.२०२६ रोजी बेंबळी पोलीस ठाणे हद्दीत २ ठिकाणी छापा टाकला. यावेळी हनुमंत रा.रुईभर ता. जि. धाराशिव हे १६.३० वा. सु. रुईभर पाटी येथे कल्याण मटका जुगाराचे साहित्य असा एकुण ८५० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले बेंबळी पो. ठाणेच्या पथकास आढळले. तर रामदास रा.रुईभर ता. जि. धाराशिव हे १७.४५ वा. सु. रुईभर गावातील ग्रामपंचायत समोर कल्याण मटका जुगाराचे साहित्य असा एकुण ६५० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले बेंबळी पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम अन्वये बेंबळी पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत.

# भारत विकास परिषदेच्या स्थापना दिना निमित्त शाळकरी मुलांना टिफिन बॅगचे वाटप




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- संपर्क, सहयोग, संस्कार सेवा आणि समर्पण या पंचसूत्रीच्या माध्यमातून संपूर्ण देशभरात शैक्षणिक, सामाजिक, पर्यावरण आरोग्य व इतर अनेक सामाजिक क्षेत्रामध्ये सेवाभावाने कार्यरत असणाऱ्या भारत विकास परिषदेच्या स्थापना दिनानिमित्त जिल्हा परिषद प्रशाला वडगाव सिद्धेश्वर येथील शाळेतील इयत्ता पहिली ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना टिफिन बॅगचे वाटप करण्यात आले.

यावेळी भारत विकास परिषदेच्या धाराशिव शाखेचे अध्यक्ष डॉक्टर सचिन रामढवे, सचिव सुहास हिंदाणे ,उपाध्यक्ष प्रशांत कावरे , उपाध्यक्ष सिद्धार्थ विठ्ठलदास, प्रांत संपर्क प्रमुख नरेंद्र पाठक, संपर्कप्रमुख डॉक्टर दिपाली रामढवे , पर्यावरण प्रमुख तृप्ती कठारे, सदस्य मिताली विठ्ठलदास , श्वेता जेवळीकर आदिसह प्रशालेच्या मुख्याध्यापिका ज्योती राऊत उपस्थित होत्या. यावेळी अध्यक्ष डॉक्टर सचिन रामढवे यांनी भारत विकास परिषदेच्या देशव्यापी कार्याची माहिती दिली व विद्यार्थ्यांमध्ये देशाविषयी माहिती निर्माण व्हावी त्यांना ज्ञान मिळावे यासाठी भारत की खोज ही प्रतियोगिता स्पर्धा परीक्षा परिषदेमार्फत घेतली जात असल्याचे सांगितले व भारत विकास परिषदेचे संपूर्ण देशभरात मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल्स , जेनेरिक मेडिसिन ,दिव्यांगासाठी कृत्रिम अवयव निर्मिती व प्रत्यारोपण , पर्यावरण संवर्धन आदि विविध सामाजिक क्षेत्रामध्ये देशव्यापी कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी प्रशालेच्या मुख्याध्यापिका ज्योती राऊत यांनी भारत विकास परिषदेचे शाळेतील विद्यार्थ्यांना मदत करण्याचे काम अत्यंत स्तुत्य असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सहशिक्षक भालचंद्र कोकाटे यांनी केले. यावेळी शाळेतील सहशिक्षक भास्कर खडबडे, सुधीर गायकवाड, सहशिक्षिका सुचिता शेलार , रेखा डाके , निर्मला गुरव, आरती करपे , माधुरी पौळ ,भूषण मदने आदीसह शाळेतील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिवसाठी ७ टीएमसी पाणी योजनेला गती द्या; ५,००० कोटींच्या भरीव निधीची एकनाथ शिंदे यांच्याकडे ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची मागणी



धाराशिव (शहा प्रतिनिधी शेख अंजुम)- मुंबई येथील नंदनवन येथे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांची धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्री. ओमप्रकाश (ओमराजे) राजेनिंबाळकर यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी धाराशिव लोकसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्न तसेच जनहिताच्या मागण्यांचे सविस्तर निवेदन उपमुख्यमंत्र्यांना सादर करण्यात आले.

यामध्ये धाराशिव जिल्ह्याच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत ७ टीएमसी पाणीपुरवठा योजनेसाठी भरीव आर्थिक तरतूद करण्याची प्रमुख मागणी करण्यात आली.

खासदार राजेनिंबाळकर यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, धाराशिव हा केंद्र शासनाच्या आकांक्षी जिल्ह्यांच्या यादीत समाविष्ट असून, सातत्याने दुष्काळ व पाणीटंचाईचा सामना करणारा जिल्हा आहे. शेती, पिण्याचे पाणी, उद्योग आणि सर्वांगीण विकासासाठी कायमस्वरूपी जलस्रोत उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी कृष्णा -मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत धाराशिव जिल्ह्यास ७ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याची योजना अत्यंत महत्त्वाची असून, हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सुमारे ५,००० कोटींच्या निधीची आवश्यकता आहे.

त्यामुळे या प्रकल्पाचा राष्ट्रीय प्रकल्प म्हणून समावेश करण्यात यावा तसेच केंद्र शासनाच्या आर्थिक सहकार्याने आवश्यक निधी उपलब्ध करून हा प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात यावा, अशी मागणी खासदार राजेनिंबाळकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली.

या योजनेमुळे होणारे प्रमुख फायदे :

* धाराशिव जिल्ह्यास कायमस्वरूपी ७ टीएमसी पाण्याचा स्रोत उपलब्ध होईल.
* हजारो हेक्टर शेती सिंचनाखाली येऊन कृषी उत्पादनात मोठी वाढ होईल.
* दुष्काळ व पाणीटंचाईच्या समस्येवर प्रभावी उपाय होईल.
* शेतकऱ्यांचे उत्पादन वाढून उत्पन्नात भरीव वाढ होईल.
* ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होईल.
* भूजल पातळीत वाढ होऊन विहिरी व बोअरवेलना वर्षभर पाणी उपलब्ध राहण्यास मदत होईल.
* औद्योगिक विकासाला चालना मिळून नवीन उद्योग व रोजगारनिर्मितीला गती मिळेल.
* ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर कमी होण्यास मदत होईल.
* जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक व औद्योगिक विकासाला नवी दिशा मिळेल.
* भविष्यातील पाणीसंकटावर कायमस्वरूपी उपाययोजना होऊन धाराशिवच्या विकासाला मोठी गती मिळेल.

धाराशिवच्या पाणीप्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य शासनाने केंद्र शासनाशी समन्वय साधत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी आवश्यक निधीची तातडीने तरतूद करून कामाला गती द्यावी, अशी आग्रही मागणी खासदार श्री. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे यांच्याकडे केली.

यावेळी उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांनी धाराशिव जिल्ह्याच्या पाणीप्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेत जलसंपदा मंत्री मा. श्री. राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांना तातडीने बैठक आयोजित करण्याच्या सूचना दिल्या. तसेच ७ टीएमसी पाणीपुरवठा योजना व कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाबाबत सविस्तर आढावा घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली.

# एका अभियंतावर चार विभागांचा भार; तुळजापूर पालिकेत रिक्त पदांचे संकट

तुळजापूर (प्रतिनिधी)-तीर्थक्षेत्र तुळजापूर नगरपालिकेतील रिक्त पदांचा प्रश्न गंभीर बनला आहे. पालिकेतील महत्त्वाची पदे रिक्त असल्याने प्रशासनाचा कारभार प्रभारी अधिकाऱ्यांच्या खांद्यावर सुरू आहे. याचा परिणाम शहरातील मूलभूत सुविधांवर होत असून, नागरिकांसह तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या हजारो भाविकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. पालिकेतील चार अभियंता पदे रिक्त असून, सध्या एकमेव स्थापत्य अभियंता अतुल तोंडारे यांच्यावर बांधकाम विभागासह पाणीपुरवठा, विद्युत आणि संगणक विभागाची जबाबदारी आहे. त्यामुळे कामाचा अतिरिक्त ताण वाढला असून, विभागांच्या कामकाजावर परिणाम होत असल्याचे चित्र आहे. तुळजापूर शहरातील स्वच्छता, पाणीपुरवठा, विद्युत व्यवस्था, अग्निशमन सेवा यांसारख्या मूलभूत सुविधांची जबाबदारी नगरपालिकेवर आहे. मात्र, मनुष्यबळाच्या अभावामुळे अनेक विविध विभागातील सेवांच्या नियोजन आणि अंमलबजावणीवर मर्यादा येत आहेत. पालिकेत राज्य संवर्गातील एकूण १५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी केवळ स्थापत्य अभियंता, लेखापाल, अंतर्गत लेखापाल आणि कर निर्धारक अशी चार पदे उपलब्ध आहेत. तर पाणीपुरवठा अभियंता, विद्युत अभियंता, संगणक अभियंता, स्थापत्य अभियंत्याचे एक पद, अग्निशमन पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक आणि कर निर्धारकाची दोन पदे अशी आठ पदे रिक्त आहेत. नगरपालिका संवर्गातील एकूण २० मंजूर पदांपैकी १० पदे उपलब्ध असून, १० पदे रिक्त आहेत. यामध्ये अग्निशमन वाहनचालक, वाहनचालक, उद्यान पर्यवेक्षक, तीन पंप ऑपरेटर, लिपिक, दोन वरिष्ठ लिपिक आणि फायरमन या पदांचा समावेश आहे.दरम्यान, तीर्थक्षेत्र म्हणून तुळजापूर शहराचे महत्त्व मोठे असून, वर्षभर येथे भाविकांची मोठी वर्दळ असते. नवरात्रोत्सव तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांच्या काळात पालिकेवरील जबाबदारी आणखी वाढते. अशा परिस्थितीत अनुभवी व पूर्णवेळ अधिकाऱ्यांची नियुक्ती नसल्याने नियोजन, देखभाल आणि तातडीच्या कामांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. रिक्त पदे तातडीने भरून पालिकेचा कारभार सुरळीत करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

स्वच्छता, अग्निशमन विभागाचा भार प्रभारींवर : पालिकेत गेल्या अनेक वर्षांपासून प्रभारी कारभार सुरू आहे. अग्निशमन पर्यवेक्षक आणि स्वच्छता निरीक्षक पदे रिक्त असल्याने या विभागांचा भार प्रभारी अधिकाऱ्यांवर आहे. त्यामुळे कामाच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याचे सांगितले जात आहे.

# बसस्थानक इन गेट समोर मद्यपी चालकावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत दत्तात्रय रा. आंबेहोळ ता. जि. धाराशिव हे दि.१०.०७.२०२६ रोजी १२.३० आपल्या ताब्यातील वाहन क्र एमएच २५ एव्ही ६८९४ ही बसस्थानक इन गेट समोर रसत्यावर मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-१८५ मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# तु उपोषणाचा अर्ज का दिलास असे म्हणून जिवे ठार मारण्याची धमकी

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणेअंतर्गत सचिन , रा. लोणी ता. परंडा, वैभव रा. शेंन्दरी ता. बार्शी जि. सोलापुर इतर दोन इसम यांनी दि.१०.०७.२०२६ रोजी लोणी येथे फिर्यादी नामे-राहुल विठ्ठल शिंदे, वय ३४ वर्षे, रा. लोणी ता. परंडा जि. धाराशिव यांना नमुद दोघांनी शिवीगाळ करुन कोयता, लोखंडी रॉड, दगड, विट, लोखंडी पाईपाने दरवाज्यावर व पत्र्यावर मारुन नुकसान केले. दारातील मोटरसायकल व स्टीलची टाकी रॉडने तोडून फोडून नुकसान केले. तु उपोषणाचा अर्ज का दिलास असे म्हणून जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-राहुल शिंदे यांनी दि.१०.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे परंडा येथे भा.न्या. सं.कलम १२५, ३२९(३), ३५२, ३५१ (२) (३), ३२४(४), ३(५) सह शस्त्र अधिनियम कलम ४/२५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## कर्जमाफीचा निर्णय योग्यच पण..

राज्यातील मोठी दिलासादायक बातमी म्हणजे शेतकऱ्यांना कर्ज माफी घोषणा केली आहे. राज्य सरकारकडून ही पहिलच कर्जमाफी आहे असे नाही. यापुर्वीही सरकारकडून कर्जमाफी मिळाली आहे. कर्ज घेणे व ते माफ करणे यापेक्षा कर्ज परत मागूच नये. कर्ज हा शब्द वगळला पाहिजे. कर्ज दोन प्रकारचे मिळतात, एक खाजगी सावकराकडून दुसरे सरकारकडून म्हणजे बँका कडून! बँका म्हणजे सरकार देत असताना सावकाराकडून कर्ज का उपसले जाते. हा संशोधनाचा विषय होवू शकतो. कर्ज घेतलेच पाहिजे असेही नाही. बिगर कर्ज घेता चालू शकते. कर्ज घेताना दोन मानसिकता निर्माण होतात, कर्ज घेणे व ते परतफेड करणे, दुसरी कर्ज हे परतफेड करण्यासाठी असते का? असे दोन विचार येतात. मुळात कर्ज घेणारे परत फेड करीत नाहीत. व्याज व मुद्दलीचा आकडा वाढतो. दिवस उगवला की, जसे आयुष्य वाढते तसे कर्जाच्या व्याजाचा डोंगर वाढतो. त्याची वेळेवर परतफेड केली केली नाही तर हा कर्जाचा डोंगर एवढा वाढतो की, जीवन संपविण्याशिवाय दुसरा विचार मनात येत नाही. त्यामुळे देशात सर्वाधिक आत्महत्या करणारे एकमेव शेतकरी आहेत. ही सर्वात मोठी लाजीरवाणी बाब आहे. मुळात सर्वावर उपायोजना शोधली जाते. कायमस्वरूपी उपायोजना केली जाते. शेतकऱ्याबाबत नाही. कर्ज देणे व माफ करणे ही उपायोजना नाही. ती तात्पुरती मलमपट्टी आहे. हे समजुन येत नाही असे नाही. ते कळते म्हणून या प्रश्नाची कायमस्वरूपी सोडवणुक होत नाही हे दुःखाने म्हणावे लागेल. यावर तोडगा निघू शकत नाही का? किंवा तो काढला जात नाही का? सत्तरवर्षात अनेकदा कर्जमाफी केली असेल. मतदानासाठी किंवा आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी उपायोजना केली असेल तर ते योग्य नाही. आपला देश कृषी प्रधान देश आहे. अशा कृषीप्रधान देशाचा मुख्य घटक हा शेतकरी आहे, त्यावर घाला घातला जात असेल. फसवी योजना असेल तर त्यावर कायमस्वरूपी विचारविनियम झाला पाहिजे. अनेक तज्ज्ञमंडळी आपल्या देशात आहे. कायमस्वरूपी तोडगा काढू शकते. असे बुद्धीमानाचा सल्ला किंवा समिती निर्माण केली जात नाही. कर्ज देणे व माफ करणे हे दुष्ट चक्र कोठेतरी थांबविले पाहिजे. शेतकरी असो किंवा जनता तीला ऐतखाऊ बनवू नका. कष्ठाचा चांगला मोबदला द्या. चांगल्यादर्जाचे उत्पादन काढून घ्या. देशातील जनतेला निकृष्ठ दर्जाचे अन्न खाऊ खालू नका. आज सरकार मान्य रेशन दुकानातून किती चांगल्याप्रतीचे धान्य मिळते. ते खरेच प्रोटीलयुक्त आहे का? आरोग्यास लाभ दायक आहे का यावर चिंतन झाले पाहिजे. विनाकारण इतर योजनेवर अधिक खर्च केला जातो. बऱ्याचवेळा विकास कामे केलेली पावसाच्याकामात वाहून गेलेली आहेत. याचा अर्थ पैसा वाया गेला हे गृहीत धरणे चुकीचे ठरणारे नाही. त्यामुळे वेळीच काही बाबीचा विचार केला पाहिजे. खाजगी सावकार या माझ्याकडे, कर्ज घ्या असे जाहिर आवाहन तर करीत नाही. त्याच्याकडे स्वखुशीने लोक जातात. त्याने काय लिहुन घेतले हे वाचतात. सह्या-अंगठा घेतात व गरज भागवितात. बँकेत किती हेलपाट घालावे लागतात. शेतकऱ्यास सहज कोणत्या बँकेने मदत-कर्ज दिले, असे होत नाही. एक तर एअरकंडीशन, बंद काचेच्या आड बसलेले पोटसुटलेले अधिकारी शेतकऱ्यास कवडी किंमत देतात हे सरकारला माहिती नाही असे नाही. कळते पण वळत नाही. बँकेच्या अकुशलतेचा परिणाम भोगावा लागतो हे शेतकऱ्यांना माहिती आहे. कर्ज घेतल्यास ते परतफेड करावी लागते. हे माहिती असते. कशी करावी याचे गणित नाही. एकतर निसर्गावर शेती हा व्यवसाय आवलंबुन आहे. निसर्ग साथ देत नाही. सर्व बाजूने संकटात आलेल्यांना सहज कर्ज माफी दिली जाते असे होत नाही. देता मग खुल्या हाताने द्या. एक बाब लक्षात घेता कर्ज माफी हा अंतिम उपाय नाही. तसे पाहिले तर एक प्रकारे व्यसन आहे. कर्ज देणे व माफ करणे, यापेक्षा दिलेली मदत परत घेवू नका. कर्ज म्हणून देताच कशाला? खाजगी सावकाराबाबत पुन्हा कधी बोलू मात्र कर्ज माफी हा काही कायम स्वरूपी उपायोजना नाही. हे लक्षात घेतले पाहिजे. उपाय नाही असे नाही उपाय आहे तो राबविला पाहिजे. मुळात शेतीत प्रगती करावी. कोंबड्या, बकऱ्या, मासेपालन असे जोडउद्योग काही कामाचे नाहीत. हे फसवे प्रकार वाटतात. जो व्यापारी किंवा व्यावसायिक असो तोच धंदा करू शकू. आज साधे उदा. घ्या. भाजीपाला शेतकरी पिकवितो. फळे पिकवितो. विकतो तो व्यापारी किंवा दलाल यांना. कमाई करतो तो व्यापारी, दलाल, मध्यस्थ. तो महागाड्या गाड्याने फिरतो पन शेतकरी व त्याचे मुले फाटके कपडे घालून फिरतांना दिसतात. साधे उदा. टरबुज एकाने घेवून शेतकरी आला. त्या शेतकऱ्याने स्वतः विकले नाही. बागवान दलालमध्यस्थास विकले. दलालाने दहा रुपयाने घेतलेले टरबुज त्या बागवानाने चाळीस-पन्नास रुपयाला विकले. ही कथा नाही तर सत्य वस्तूस्थिती आहे. श्रीमंत कोण होणार? भिकारी कोण होणार? कर्जबाजारी कोण होणार? वास्तविक त्या शेतकऱ्याने जेवढी किंमत टरबुजला येईल तु विक अर्धे-अर्धे वाटून घेवू असे मनात आले नाही. शेतकरी हा कष्ठकरी, पोसिंदा आहे. त्याला तेवढी बुद्धी येणार कशी? त्याला आता पर्यंत मर्यादित ठेवले. चौकटीत ठेवले ही बाब लक्षात घ्यावा. कर्जमाफीने आर्थिक संकट दूर होणार नाही. प्रत्यक्षात काय केल्याने संकटमुक्त होवू याचा विचार केला पाहिजे. उठसुट शेतकरी जीवनसंपवित आहेत. जीवन अनमोल आहे. ईश्वराने दिलेले आहे. त्यामुळे संकटावर मात करावी. व्यापारी दृष्टिकोन ठेवावा. आपण व्यापारी, उद्योगपती बनू शकतोत. शेततील प्रत्येक बाब विक्री करता येते. पैसा कमावता येतो. साधे शेंण, शेंणाच्या गौऱ्या, काळी माती, गणपतील लागणारी हराळी, लाकुड, कैऱ्या असे कितीतरी बाबीचा व्यावसाय धंदा करू शकताते. त्यामुळे शेतकऱ्यांनी विचार करावा, भीख मागून कोणाचेही पोट भरत नाही.असे दुःखाने, मनाला वेदना होत असताना बोलावे लागते. त्यामुळे शेतकरी बांधवाने विचार करा. स्वावलंबी बना. तुम्ही कष्ठाने पिकविलेले सोयाबिन स्वस्तात घेवुन गोडावुन भरून आज काय किंमतीला विक्री होत आहे याचा विचार करा. बस या पेक्षा काय?

# निसर्गाच्या प्रयोगशाळेतील एक जीवन प्रवास

**सारे ऋतू माझ्यात उतरले, सारे रंग माझ्यात फुलले,**
**निसर्गाच्या त्या प्रयोगशाळेत, संस्कारांचे बीज उगवले.**
**निसर्ग हळूच हसून म्हणाला, सारे शिकलास तू आता...**
**मोठं होण्यापेक्षा, आधी फक्त 'माणूस'हो रे ताता!**



बालपणी आपण निसर्ग फक्त पाहतो; नद्यांत दगड मारतो, झाडांवर चढतो आणि फुलपाखरांच्या मागे धावतो. पण मोठे झाल्यावर आपण निसर्ग ''वाचायला'' शिकतो. तेव्हा लक्षात येते की, झाडे बोलत नाहीत, नद्या प्रवचन देत नाहीत आणि सूर्य कधीही व्यासपीठावर येऊन भाषण करत नाही, तरीही हे सारे घटक आपल्याला जगण्याचे सर्वात मोठे धडे देत असतात. निसर्ग ही एक अशी जिवंत प्रयोगशाळा आहे, जिथे ''माणूस'' घडण्याची प्रक्रिया निरंतर सुरू असते. जर आपण खऱ्या अर्थाने या घटकांशी संवाद साधला, तर लक्षात येईल की निसर्गातील प्रत्येक घटक आपल्याला माणूस होण्याचे निमंत्रण देत आहे.

झाड होऊन जगावे, असे वाटते तेव्हा लक्षात येते की, झाड स्वतःसाठी एकही फळ खात नाही. ते स्वतःच्या अंगावर ऊन झेलते, पण इतरांना सावली देते. जगण्याचा अर्थ ''स्व''च्या पलीकडे जाऊन ''सर्व'' होण्यात असतो, हे झाड आपल्याला आपल्या शांत मुद्रेने शिकवते. उदारता आणि त्याग हे केवळ शब्द नसून ते जगण्याचे बळ आहेत, हे झाडाकडून शिकावे. तसेच, पर्वताकडे पाहावे. शिखरे कितीही उंच असली, तरी पर्वत आपल्या पायाशी असलेल्या दऱ्यांना धरून ठेवतो. वादळे येतात, पाऊस कोसळतो, ऊन-वारा थडकतो, पण पर्वत आपल्यातत्त्वांवरून हलत नाही. जीवनातही ''स्थैय'' आणि ''धैर्य'' असेल, तर आपत्तींचे रूपांतर संधीत करता येते.

कधी वाटतं, एखाद्या खळाळणाऱ्या झऱ्यासारखं व्हावं. झरा म्हणतो, ''अडथळा म्हणजे शेवट नाही.'' दगड आडवा आला की झरा रस्ता बदलतो, पण आपला प्रवाह थांबवत नाही.चिकाटी म्हणजे काय, हे या छोट्याशा झऱ्याकडून शिकावे. तर कधी सूर्यासारखं व्हावं. सूर्य कधी अंधाराशी भांडत नाही. तो फक्त उजेड देतो आणि अंधार आपोआपच आपली जागा सोडून पळ काढतो. आयुष्यातही इतरांच्या दोषांशी लढण्यापेक्षा, स्वतःच्या सकारात्मकतेचा प्रकाशइतका वाढवावा की नकारात्मकता आपोआप नष्ट होईल.माणूस म्हणून घडताना ''ढग'' होणेही गरजेचे असते. ढग जेव्हा भरून येतात, तेव्हा ते स्वतःसाठी साठवून ठेवत नाहीत; ते बरसतात. ''दान'' आणि ''करुणा'' यांचे हेच स्वरूप आहे.

पावसाचा एखादा थेंब किती लहान असतो, पण तहानलेल्या जिवासाठी तो ''अमृत'' असतो.आयुष्यात आपण मोठी कार्ये करत नाही, तरी चालेल; पण एखाद्याच्या डोळ्यातील पाणीपुसणारा एक छोटासा प्रयत्नही पावसाच्या थेंबासारखा मोलाचा असतो. वाऱ्यासारखे निःस्वार्थअसावे. वारा कोणाला दिसत नाही, पण तो स्पर्शातून ओळखला जातो. तसाच आपला सेवाभावअसावा, जो कोणालाही न



दाखवता, फक्त अनुभवायला असावा.

केव्हा कधी एखादी मंद झुळूक होऊन जावे. खूप मोठा बदल नेहमी गडगडाटाने होतनाही, कधी तो झुळुकीच्या हळुवार स्पर्शानेही घडतो. हीच संवेदनशीलता माणसाला माणसाशीजोडते. विविधतेत एकता शोधण्यासाठी इंद्रधनुष्याकडे पाहावे. सात रंग वेगळे आहेत, पण जेव्हाते एकत्र येतात, तेव्हाच सौंदर्य जन्मते. समाजातही विचारांची विविधता असावी, पणमाणुसकीच्या धाग्याने आपण एकत्र असायला हवे. नदी साक्षात गुरु आहे; ती कधीही मागेवळून पाहत नाही, म्हणूनच ती समुद्रापर्यंत पोहोचते. भूतकाळात रमून जाण्यापेक्षा, सतत पुढेवाहत राहणे, म्हणजेच सतत ''शिकत राहणे'' हीच नदीची जीवनगाथा आहे.

चांदणे सांगते की, अंधार संपवण्यासाठी प्रत्येक वेळी सूर्यच व्हावे लागते असे नाही; कधीकधी काजव्यासारखा किंवा चांदण्यासारखा छोटासा उजेडही दिशा दाखवण्यासाठी पुरेसा असतो. आणि दवबिंदू? तो क्षणभराचा असतो, पण पहाटेची शोभा वाढवून जातो. आयुष्यात आपण किती वर्षे जगलो, यापेक्षा ते किती ''सुंदर'' जगलो, हे महत्त्वाचे. फुलपाखरू तर आत्मपरिवर्तनाचा सर्वात मोठा धडा आहे. कोष सोडून बाहेर येताना होणारी वेदना सोसल्याशिवाय त्याला पंख मिळत नाहीत. त्याचप्रमाणे, जुन्या विचारांच्या कोशातून बाहेर पडल्याशिवाय माणसाला विचारांची भरारी घेता येत नाही.

या प्रवासात आपण बांबूच्या झाडाचा दृष्टांत लक्षात ठेवला पाहिजे. बांबू सुरुवातीला अनेक वर्षे जमिनीच्या खाली आपली मुळे घट्ट करत असतो. वरून पाहणाऱ्याला वाटते, याची वाढच होत नाहीये. पण एकदा का मुळे भक्कम झाली की, तो अवघ्या काही दिवसांत आकाशाला गवसणी घालतो. माणसाचेही तसेच आहे; जर मूल्यांची आणि संस्कारांची ''मुळे''भक्कम असतील, तर यशाची ''उंची''आपोआप मिळते. दिवा जसा स्वतःची ज्योत दुसऱ्यालादेताना कमी होत नाही, उलट उजेड वाढवतो, तसे ज्ञान आणि प्रेम वाटल्यानेच वाढते.

आयुष्याच्या अंती आईने दिलेला तो संदेश आठवतो. तिने कधीही ''मोठा माणूस'' असे म्हटले नाही, तर ''आधी माणूस'' असे म्हटले. ती म्हणायची, ''झाड व्हायचं असेल तर आधी सावली द्यायला शिक, सूर्य व्हायचं असेल तर आधी स्वार्थाची राख करायला शिक आणि नदी व्हायचं असेल तर प्रवाहाला अर्थ द्यायला शिक.'' खरं तर, निसर्गातील प्रत्येक घटक आपल्याला रोज घडवत होता, शिकवत होता; पण ऐकणारा आणि पाहणारा ''माणूस'' मीच नव्हतो. निसर्ग हा मानवाच्या प्रगतीचा मार्गदर्शक आहे.

पद, प्रतिष्ठा आणि पैसा हे तर काळाच्या ओघात गळून पडणारे अलंकार आहेत. पण झाडाची उदारता, नदीची गतिशीलता आणि सूर्याची सकारात्मकता ज्याच्याकडे आहे, तोच खरा ''माणूस'' म्हणून शोभून दिसतो. आज निसर्गाच्या या प्रयोगशाळेतून बाहेर पडताना, मला एकच मंत्र सोबत घेऊन जायचा आहे- ''आता'' मला फक्त जगण्याचे तंत्र नाही, तर ''माणूस'' होण्याचे ''तत्त्व'' उमजले आहे. कारण अखेरीस, या विश्वात आपण कोणत्या नावाने ओळखले जातो, यापेक्षा आपण '' माणूस'' म्हणून किती अर्थपूर्ण जगलो, हेच जास्त महत्त्वाचे आहे.

- राहूल हरिभाऊ इंगळे पाटील
मोबाईल ९८९०५७७१२८

# वारकऱ्यांची सेवा हीच विठुरायाची सेवा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी:** मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्यावतीने आयोजित 'श्री क्षेत्र पंढरपूर आषाढी वारी चरण सेवा' उपक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज भेट देऊन वारकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी वारकऱ्यांची सेवा हीच विठुरायाची सेवा असल्याचे सांगत अशा सेवाकार्यात सहभागी होणे हे मोठे भाग्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे दर्शन घेऊन व आशीर्वाद घेऊन या सेवाकार्यात सहभागी होत असल्याचा विशेष आनंद आहे. वारीत सहभागी होणारे वारकरी भगिनी-बंधू दीर्घ पायी प्रवास करून येथे पोहोचतात. त्यांचा शारीरिक शीण दूर व्हावा, या उद्देशाने राबविण्यात येणारा 'चरण सेवा' उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे.

वारकरी संप्रदायात प्रत्येकामध्ये माऊलीचे दर्शन घेतले जाते. एकमेकांच्या चरणी नम्रतेने वंदन करण्याची परंपरा ही समतेचा आणि भक्तीचा संदेश देणारी आहे. अशा वारकऱ्यांच्या चरणांची सेवा करण्याची संधी मिळणे हे मोठे भाग्य असून, विठुरायाच्या भक्तांची सेवा हीच विठ्ठलभक्ती असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमात तरुण स्वयंसेवक मोठ्या समर्पित भावनेने वारकऱ्यांची सेवा करत असल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. या सेवाकार्यात सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवी संस्था, कार्यकर्ते आणि आयोजकांचे त्यांनी अभिनंदन केले. विशेषतः आमदार श्री. सुनील कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या कार्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी कौतुक केले.

ग्रामविकास विभागामार्फत आधुनिक पद्धतीच्या चरण सेवा यंत्रांचीदेखील उपलब्धता करून देण्यात आली असून त्याद्वारे वारकऱ्यांना अधिक चांगली सुविधा मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. गेल्या काही वर्षांत आषाढी वारीच्या व्यवस्थापनात अनेक सकारात्मक बदल करण्यात आल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले, वारकऱ्यांसाठी जर्मन हँगरची व्यवस्था, निर्मल वारी अभियान, प्रशस्त पालखी मार्ग अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच येत्या दोन ते तीन वर्षांत पंढरपूर कॉरिडॉरचे काम पूर्ण करण्याचा शासनाचा मानस असून, भविष्यात पंढरपूरचा विकास काशी, अयोध्या आणि उज्जैनप्रमाणे आदर्श धार्मिक क्षेत्र म्हणून करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार सुनील कांबळे, हेमंत रासने आदी उपस्थित होते.

# '१०० सर्वाधिक प्रभावशाली महिलांचा सन्मान'; महिला स्वयंसहायता गटांमुळे देशात क्रांती - राज्यपाल




**मुंबई/प्रतिनिधी:** महिला स्वयंसहायता गटांमुळे देशातील महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय सक्षमीकरणाला गती लाभली असून ग्रामीण - आदिवासी महिलांच्या जीवनात क्रांतिकारक बदल झाले आहेत. गावोगावींच्या महिलांमध्ये नेतृत्वगुण विकसित होत आहेत. हे कार्य अधिक जोमाने होण्यासाठी समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचले पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज येथे केले.

'फॉर्च्युन इंडिया' मासिकातर्फे देण्यात येणाऱ्या 'फॉर्च्युन इंडिया १०० मोस्ट पॉवरफुल वूमेन (सर्वाधिक प्रभावी महिला)' पुरस्काराचा आरंभ राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत १० जुलै रोजी मुंबई येथे झाला, त्यावेळी ते बोलत होते. केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात राज्यपालांच्या हस्ते 'फॉर्च्युन इंडिया' मासिकाच्या नव्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

विविध क्षेत्रात नेतृत्वस्थानी असलेल्या महिलांना संबोधित करताना, राज्यपाल म्हणाले की, महिला स्वयंसहायता गटांमुळे स्वतःच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून इतरांना देखील प्रोत्साहन देणाऱ्या महिला अनेक ठिकाणी उदयास आल्या आहेत.

पूर्वी बँकेत जाण्यास देखील घाबरणाऱ्या त्रिपुरा येथील एका ग्रामीण महिलेने कालांतराने स्वतः अधिकाऱ्यांसमोर आत्मविश्वासाने पॉवर पॉईंट सादरीकरण केले त्यावेळी सर्व उपस्थित आश्चर्यचकित झाले होते. ती महिला 'बँक सखी' म्हणून आज अनेक महिलांना मदत करीत असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांकडील अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण (एनपीए) १ टक्क्यापेक्षाही कमी आहे. महिलांकडे गेलेला पैसे सुरक्षित असतो, असे त्यांनी सांगितले.

देशातील ५० टक्के नागरिक महिला असल्यामुळे त्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष करून 'विकसित भारता'चे लक्ष्य साध्य करता येणार नाही. त्यामुळे समाजातील शेवटच्या स्तरावरील महिलेपर्यंत पोहोचून तिचे सक्षमीकरण झाले पाहिजे, असे राज्यपालांनी सांगितले.



**महिला परिवर्तनाच्या अग्रस्थानी : अनुप्रिया पटेल**

आज महिला तळागाळापासून ते उद्योग जगतातील मोठमोठ्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत आहेत. विकास प्रक्रियेत त्या केवळ सहभागी होत नसून परिवर्तनाच्या अग्रस्थानी आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी यावेळी केले. यावेळी त्यांनी उपस्थितांना केंद्र शासनाच्या महिला सक्षमीकरणाच्या कार्याची माहिती दिली. मातेचे आरोग्य सुधारण्यासाठी तसेच माता मृत्युदर कमी करण्यासाठी केंद्र शासनाच्या कार्याची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आल्याचे सांगून त्यांनी 'नारीशक्ती वंदन' अधिनियम व 'पोषण अभियान' उपक्रमाची माहिती दिली. गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून महिलांचे रक्षण करण्यासाठी केंद्र शासनातर्फे एचपीव्ही लस देण्यात येत असल्याचे सांगून त्यांनी 'आयुष्मान भारत' योजना, 'जनऔषधी औषधालये, लखपती दीदी, नमो ड्रोन आदी योजनांची माहिती दिली.

सुरुवातीला राज्यपालांच्या हस्ते 'फॉर्च्युन इंडिया' मासिकाच्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. आरपी संजीव गोयंका समूहाचे उपाध्यक्ष शाश्वत गोयंका यांनी प्रास्ताविक केले तर 'फॉर्च्युन इंडिया'चे मुख्य संपादक सौरव मुजुमदार यांनी आभारप्रदर्शन केले.

उदघाटन सत्राला नॅशनल स्टॉक एक्स्चेंजचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिषकुमार चौहान, रिलायन्स फाउंडेशनच्या अध्यक्षा नीता अंबानी, माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी, कॉर्पोरेट लॉ फर्म एझेडबी अँड पार्टनर्सच्या सह संस्थापिका झिया मोदी, नीरजा बिर्ला यांसह उद्योग, व्यवसाय, बँकिंग क्षेत्रातील प्रभावी महिला उपस्थित होत्या.

# केंद्रीय संचार ब्यूरोच्या आषाढी वारी विशेष चित्ररथाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन




**पुणे/प्रतिनिधी:** केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरो, प्रादेशिक कार्यालय, पुणे यांच्या वतीने आषाढी वारी सोहळ्यानिमित्त जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या विशेष चित्ररथाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी केंद्रीय नागरी हवाई वाहतूक तथा सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पीएमपीएमएलचे संचालक अजय खेडेकर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

(क्रमशः कालच्या अंकावरुन...)

## राष्ट्रनिष्ठ जहाल क्रांतिकारक

परवानगी मागून घेतली. मृत्यूच्या छायेत संगीतातील आनंद घेत सर्वांना आनंद वाटण्याचे कलापूर्ण काम काहींनी केले. बरेच दिवस खटला चालून ६ एप्रिल १९२७ रोजी या खटल्याचा निकाल लागला. या खटल्यात काही जणांना फाशी, मन्मथनाथ गुप्त यांना १४ वर्षे तर योगेशचंद्र चटर्जी, मुकुंदीलाल, गोविंदचरण कार, राजकुमार सिन्हा आणि रामकृष्ण खत्री यांना दहा वर्षे कारावास ठोठावण्यात आला. तसेच इतरांनाही वेगवेगळ्या शिक्षा ठोठावण्यात आल्या.

अन्यायाविरुद्ध निदर्शने

ब्रिटिशांना विश्वास होता की दीर्घ कैद, कठोर श्रम, खटले, वकिली अडथळे आणि सामाजिक एकाकीपणा यांनी क्रांतिकारी चळवळ मोडून पडेल. पण प्रत्यक्षात रामकृष्ण खत्री आणि इतर स्वातंत्र्यलढ्यातील कैद्यांनी क्रांतिकारकांना अधिक दृढ,विचारशील तसेच संघटित केले. रामकृष्ण खत्रींच्या कारावासाचे महत्त्व हे त्यांच्या स्वातंत्र्यलढ्याच्या सामूहिक इतिहासातील एक प्रतीक म्हणून महत्त्वाचे ठरले. कैदेमध्ये असताना वाचन, लेखन, चर्चा आणि आत्मचिंतन याचा आधार त्यांनी घेतला. तुरुंग हे त्यांच्या दृष्टीने शाळा बनली. अनेक वेळा राजकीय कैद्यांनी उपोषणे आणि तुरुंगातील अन्यायाविरुद्ध निदर्शने केली. यामध्ये प्रामुख्याने खत्री यांचा समावेश होता. काकोरी खटल्यात शिक्षा होऊनही स्वाभिमान न सोडता रामकृष्ण खत्री यांनी कठोर कारावासाचा काळ गमावलेला कालखंड न मानता तो देशभक्तीच्या खडतर साधनेचा एक टप्पा मानला. रामकृष्ण खत्री यांनी संपूर्ण शिक्षा भोगून झाल्यावर कैदेतून बाहेर आल्यावर सर्वप्रथम राजकुमार सिन्हा यांच्या घराची व्यवस्था लावली. योगेशचंद्र चॅटर्जी व इतर आपल्या सहकारी क्रांतिकारकांची कैदेतून सुटका करण्याचा प्रयत्न केला, कारण न्यायालयात जेव्हा अपील करण्यात आले तेव्हा गोविंदचरण कार, योगेशचंद्र चटर्जी आणि मुकुंदीलाल यांची दहा वर्षांची शिक्षा वाढवून ती जन्मठेप काळ्या पाण्याची करण्यात आली होती. यानंतर रामकृष्ण खत्री यांनी सर्व राजकीय कैद्यांना तुरुंगातून मुक्त करण्यासाठी एक आंदोलन केले होते ज्याचा उपयोग झाला. रामकृष्ण खत्री यांनी काकोरी येथील काकोरी शहीद स्मारक बांधण्यासाठी प्रेमकृष्ण खन्ना यांच्या सहकार्याने प्रयत्न केले व त्याला यश येऊन ते बांधण्यात आले.

१७,१८,१९ डिसेंबर १९७७ रोजी काकोरी शहीद सेमी शताब्दी सोहळा काकोरी येथे रामकृष्ण खत्री यांनी घडवून आणला. अलाहाबाद येथे शहीद चंद्रशेखर आझाद यांचा बलिदान सोहळा २७, २८ फेब्रुवारी १९८१ रोजी खत्री यांच्या पुढाकारातून साजरा करण्यात आला. २२, २३ मार्च १९८१ रोजी नवी दिल्ली येथे शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांची फासावर गेल्यानंतरची अर्धशताब्दी साजरी करण्यात आली, ज्यामध्ये रामकृष्ण खत्री यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. बिहारचे माजी राज्यपाल आणि केंद्रीय मंत्री लालजी टंडन यांच्या हस्ते काकोरी स्मारक स्थळावरील स्वातंत्र्यलढ्यातील काकोरी घटनेतील शहीद स्वातंत्र्यसैनिकांच्या मूर्तींचे अनावरण रामकृष्ण खत्री यांना करावयाचे होते पण ते येऊ न शकल्याने उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री कल्याणसिंह यांचे हस्ते या मूर्तींचे अनावरण करण्यात आले.

रामकृष्ण खत्री यांनी लिहिलेले 'शहीदों की छाया में' हे पुस्तक विश्वभारती प्रकाशन, नागपूर यांचेवतीने १९८३ मध्ये छापले गेले होते. यापूर्वी रामकृष्ण खत्री यांचे 'काकोरी शहीद स्मृति' हे पुस्तक १९७८ मध्ये राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी यांच्या हस्ते दिल्ली येथे प्रकाशित करण्यात आले होते. १८ ऑक्टोबर १९९६ रोजी वयाच्या ९४ व्या वर्षी लखनौमध्ये त्यांचे निधन झाले. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक क्रांतिकारक विस्मरणात गेले. पण रामकृष्ण खत्री हे स्वातंत्र्यानंतर स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृती जिवंत ठेवण्याचे, काकोरी शहीद स्मारक उभारण्याचे, क्रांतिकारी इतिहास लिहिण्याचे आणि शासनदरबारी स्वातंत्र्यसैनिकांच्या सन्मानासाठी पाठपुरावा कार्य करण्याचे कार्य करीत राहिले. हे कार्य राष्ट्रनिर्मितीच्या दुसर्या टप्प्यासाठी महत्त्वाचे होते. स्वातंत्र्य मिळविणे याबरोबरच स्वातंत्र्याचा इतिहास जपणे, त्याच्या हुतात्म्यांची स्मृती जतन करणे आणि पुढील पिढ्यांपर्यंत ती पोहचविणे हेही तितकेच महत्त्वाचे काम रामकृष्ण खत्री यांनी केले. जहाल स्वातंत्र्यसेनानी रामकृष्ण खत्री यांना समजून घेताना केवळ बिचपुरी दरोड्यातील आणि काकोरी दरवड्यातील सहभाग एवढ्यापुरता न पाहता त्यांनी लोकमान्य टिळक यांच्याकडून घेतलेला वसा तसेच त्यांनी स्वातंत्र्यलढ्यासाठी केलेले युवकसंघटन महत्त्वाचे आहे. त्यांची भाषिक क्षमता, स्वातंत्र्यलढ्यातील नेत्यांशी आणि युवकांशी घडवून आणलेल्या संपर्कासाठी महत्त्व-ाची होती. रामकृष्ण खत्री यांचे जीवन टिळकांच्या अनुयायांपासून ते काकोरीच्या क्रांतिकारकांपर्यंत आणि पुढे स्वातंत्र्यस्मृतीच्या संरक्षकांपर्यंत होते. त्यांचा प्रवास हा भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक समृद्ध, गंभीर आणि तेजस्वी अध्याय आहे.




# जाणून घ्या लसूण आणि मधाचे चमत्कारिक फायदे

रोज सकाळी रिकाम्या पोटी सेवन करणे ठरते फायदेशीर

तुम्हाला माहित आहे का की रोजच्या जेवणाची चव वाढवणारा लसूण खाल्याने अनेक चमत्कारिक फायदे होतात. लसनाप्रमाणे मधाचे सेवन देखील शरीरासाठी फायदेशीर ठरते.

आयुर्वेदानुसार, जर तुम्ही वाढत्या कोलेस्ट्रॉलनं त्रस्त असाल तर लसणाच्या कच्च्या पाकळ्याचं सेवन करणं फायदेशीर मानलं जातं. लसणात 'एलिसिन' नावाचं गुणकारी घटक असतं. हे एक प्रकारचं नैसर्गिक प्रतिजैविक आणि अँटीऑक्सिडंट असून याचं सेवन केल्यानं शरीरातील रक्तभिसरण सुधारण्यास मदत होते. तसेच, यामुळे रक्तही जाड होत नाही. लसणामध्ये असलेलं सल्फर आणि इतर रसायने लसणाला बॅक्टेरियाविरोधी आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याचे गुणधर्म प्रदान करतात.तसेच, मध हा निसर्गाचा एक अनमोल ठेवा असून मधुमेह असलेल्या व्यक्तींवरही मधाचा फारसा परिणाम होत नाही. यामध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि पॉलिफेनोल्स हे दोन महत्त्वाचे अँटीऑक्सिडंट्स असतात. यामुळे, शरीरातील खाज, लालसरपणा कमी होण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होण्यास मदत होते. मधामध्ये असलेले अँटीबॅक्टेरियल, अँटीव्हायरल आणि अँटीफंगल गुणधर्म विविध आजारांशी लढण्यासाठी अंत्यत उपयुक्त ठरतात.लसूण आणि मध या दोन्ही मिश्रणांना आपल्या शरीरासाठी अमृत मानलं जातं. हे दोन्ही मिश्रण श्वसनाचे आजार, संसर्ग, त्वचा रोग, हृदयविकार आणि पोटासंबधित समस्यांवर अत्यंत प्रभावी ठरतात. यामुळे सर्दी, खोकला आणि तापाची लक्षणे कमी होण्यास मदत होते. तसेच, रक्त पातळ होऊन 'स्ट्रोक'चा धोका कमी होतो. याबरोबरच उच्च रक्तदाब, संधिवात, दातदुखी आणि बद्धकोष्ठतेसाठीही हे अत्यंत गुणकारी मानलं जातं. त्यामुळे या दोन्ही मिश्रणाचं नियमितपणे सेवन करणं आपल्या शरीरासाठी अत्यंत गुणकारी मानले जाते.असे तयार करा लसूण आणि मधाचे चमत्कारिक मिश्रण :एका स्वच्छ काचेच्या बरणीत ताज्या लसणाच्या पाकळ्या सोलून टाका. त्यात शुद्ध मध घालून बरणी पूर्ण भरा. ५ ते ७ दिवस हे मिश्रण तसेच राहू द्या (मिश्रण छान मुरू द्या) त्यानंतर दररोज सकाळी रिकाम्या पोटी याचे सेवन करा.टीपः लहान मुले आणि गर्भवती महिलांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरच याचे सेवन करावे.




महाराष्ट्र शासन

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर.

जलसंपदा विभाग

(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)

**कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव यांचे कार्यालय, आनंद नगर, सिंचन भवन, धाराशिव.**

E-mail :- eelisdn@gmail.com दूरध्वनी क्र.०२४७२-२९५१७१

**ई-निविदा सूचना क्र.- ०२ सन २०२६-२७ (दुसरी वेळ)(ऑनलाईन)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने **कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव**, हे जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव,** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नांव :- | कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना क्र. २ अंतर्गत नळदुर्ग बॅरेज क्र.२ ता. तुळजापूर जि. धाराशिव च्या बुडीत क्षेत्रातील पुलाचे बांधकाम करणे. |
| २. | जिल्हा :- | धाराशिव |
| ३. | निविदा किंमत :- | रु. ३३९.९६ लक्ष (वस्तु व सेवाकर वगळता) |
| ४. | ई-निविदा उपल्ब्ध कालावधीः- | **दि.१३/०७/२०२६ ते दि. २०/०७/२०२६** |
| ५. | ई-निविदा उघडण्याचा दिनांकः- | **दि.२२/०७/२०२६** |
| ६. | ईसारा/बयाना रक्कमः- | **रु.01,70,000/-** |
| ७. | काम पुर्ण करण्याचा कालावधीः- | **१८ महिने** |
| ८. | ई-निविदा संचाची किंमतः- | **रु.2360/- (GST सह)** |

२. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवर कळविण्यात येईल.

**जा.क्र/उसिंवी/निविदा/1734/2026**
कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, धाराशिव यांचे कार्यालय. **दिनांकः- 07/07/2026**

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**उपसा सिंचन विभाग, धाराशिव**


(क्रमशः उद्याच्या अंकात)

## आईच्या संरक्षणासाठी जीव दिला

मुलांचे नैतिक कर्तव्य असते. जर त्यांनी नैतिक कर्तव्याचे पालन केले नाही तर ते अधर्माचे भागीदार होतात व समाजात त्यांची निंदा होते.

बुद्ध याबाबतीत खुप संवेदनशील होते म्हणून त्यांनी व्यवस्था दिली की, व्यक्ती आपल्या आई-वडिलांच्या परवानगीशिवाय भिख्खुसंघात दीक्षा घेऊ शकत नाही. याचे तात्पर्य व्यक्ती आपल्या आई-वडिलांप्रती कर्तव्य सोडून भिक्खु बनू शकत नाही. बुद्धांने गृहस्थासाठी दिलेल्या तत्वात आई-वडिलांची सेवा प्रथम होती.

प्राचीन भारतात आई-वडिलांची सेवा सर्वात मोठे मूल्य मानले जात होते. या मूल्याच्या प्रचार-प्रसारासाठी पुराण व बौद्ध जातक कथांमध्ये अनेक प्रसंग मिळतात, ज्याच्या माध्यमातून यास जास्त व्यावहारिक बनवले जाऊ शकेल. श्रवणकुमारची गोष्ट सर्वांना माहित आहे. येथे अनेक लोककथा व लोकगीतांमध्ये आई-वडिलांच्या सेवाचा उल्लेख करण्यात आला आहे. जातक कथांमध्ये असे अनेक संदर्भ मिळतात, ज्यात बोधिसत्वांनी आपल्या आई-वडिलांच्या सेवेत जीवनाची आहुती दिली होती.

चुल्लनन्दिय जातकात बोधिसत्व हिमालयात नन्दिय वानर होते. त्यास छोटा भाऊ होता. ते दोघे ८० हजार वानरांचे नेतृत्व करत असल्यामुळे आपल्या आंधळ्या आईची सेवा पूर्ण वेळ करु शकत नव्हते म्हणून त्यांनी वानरांचे नेतृत्व सोडून पूर्ण वेळ आईची सेवा करण्यास सुरुवात केली.

एकेदिवशी एक शिकारी, शिकारीच्या शोधात बोधिसत्व आई व छोट्या भावासह राहत असलेल्या झाडाखाली आला. शिकारीचे लक्ष त्याच्या आईकडे गेले व त्याने आईच्या दिशेने बाण साधला. मातृभक्त नन्दिय शिकारीसमोर येऊन म्हणाला की, हवं तर मला मार पण माझ्या आईला सोड. निर्दयी शिकारीने बोधिसत्वाची हत्या केली. त्यानंतर शिकारीने छोटा भाऊ व आईला मारले.

आई, बोधिसत्व व भावाच्या हत्येच्या महापापामुळे त्यावेळी भयंकर वादळ आले, ज्यात शिकारीचे संपूर्ण कुटूंब मरण पावले. नंतर तुटलेल्या घराच्या खांबाखाली दबून तो पापी शिकारी सुद्धा मरण पावला.आज काही लोक आपल्या आई-वडिलांना घराबाहेर काढतात. काही त्यांची संपत्ती बळकावून त्यांना वृद्धाश्रमात पाठवतात. पण त्यांना हे माहित नसते की, त्यांचे मुलं भविष्यात त्यांच्यासोबत असाच व्यवहार करतील.

### १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




खरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात. स्खलन झाल्यानंतर ताठरता कमी होत-होत नष्ट होते. शीघ्रपतनावर उपचार करताना या लैंगिक प्रतिसादावर विशेष लक्ष द्यावं लागतं.डॉ. संजय देशपांडे, कन्सल्टंट सेक्सॉलॉजिस्टखरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. **(क्रमश. )**

### २ Joke — विनोद




बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू - माझ्याच वयाचे आहेत.
बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

### ३ Message — संदेश



Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .


### ४ Thought — सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.- **डॉन प्याट**

**संस्कृत सुभाषित**
**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्वमविक्रियः।।**
**मराठीत अर्थ**
आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

२. शेवट, मावळणे
३. अकबराशी शर्थीने लढणारा शूर राजपूत
७. ताठा
८. प्रतिबंध
१०. समेट
११. झेप
१२. व्यवस्थित
१६. शपथ
१७. आकाश
१९. दासी
२०. स्वयंपाकाची कला
२१. दहशत
२३. दारुमुळे निकामी होणारा अवयव
२४. जिन्नस
२५. राजाची पत्नी
२६. त्वरित
२८. वर्ष
३०. हत्ती
३२. सूर्य
३४. भारताच्या दक्षिणेचा समुद्र
३८. वाटाड्या
४०. ओळ
४१. लहान
४२. पाणी
४३. पाणी
४३. समानता
४५. जास्त किमतीचे
४६. व्यापारी
४७. एक कडसर पालेभाजी
४९. मुलाची पत्नी
५०. अपशकुन
५२. पालखी
५३. अश्व
५४. पोहणे
५६. डोके
५७. बूड
५८. रावणाची मुखे
५९. हस्त
६०. पाश्चात्य स्नानपात्र
६१. मार्ग
६२. अपराध्याच्या वतीने घातलेली भीड
६४. छोटा
६६. स्त्री
६८. परिणय
६९. घट्ट
७०. नस
७१. झोप
७३. वात्सल्य
७४. आजार
७६. मिठी
७९. आईची बहीण
८२. पुष्कळ (ग्रामीण)
८४. बंगाली मिठाई प्रकार
८७. रुची, पसंती
८८. विपुल
८९. सरशी

### उभे शब्द

१. आटोपशीर आकारचे
२. भूमी
४. रूढी
५. अंगिकार, स्वीकार
६. वनराज
७. नोकर
९. पुष्कळ
११. जमीन व पाणी यापैकी कोठेही राहू शकणारा सजीव
१३. पत्र
१४. सूतकताईचे साधन
१५. मिश्रण, खिचडी
१६. थालिपीठ वा चकलीचे पीठ
१८. पूर्वज
२२. शक्ती
२४. अपमान
२५. राजाची आई
२७. गांधीजींचे एक तत्त्व
२८. सारखा
२९. तल्लीन
३१. सुखी माणसाचे वस्त्र
३३. वीर स्त्री
३५. केविलवाणा
३६. कुत्रा (सं.)
३७. आवड
३९. दुर्दैव
४४. प्रासाद
४८. पुन्हा
५१. ताजेपणा
५२. कृपा
५३. स्वयंपाकात तसेच सौंदर्य प्रसाधनातही वापरला जाणारा पिवळे चूर्ण
५४. प्रखर
५५. तृष्णा
५७. झाकीर हुसेन यांचे वाद्य
६०. टिंगल
६३. सहजी
६५. नुकसानकारक
६६. मराठी माणसाची प्रिय करमणूक
६७. शांतता
७२. झुंड
७३. मक्षिका
७५. ताकद
७७. आशीर्वाद
७८. वन, बाग
८०. पारंब्या असलेले झाड
८१. आदर
८३. शाहिराचे वाद्य
८५. सांप्रत
८६. ध्येय

### आडवे उत्तरे

२.अस्त ३.राणा प्रताप सिंह ७.गर्व ८.अटकाव १०.तह ११.उडी १२.नीटनेटका १६.भाक १७.नभ १९.बटीक २०.पाककला २१.जरब २३.यकृत २४.माल २५.राणी २६.लगेच २८.सन ३०.गज ३२.रवी ३४.हिंदी महासागर ३८.मार्गदर्शक ४०.रांग ४१.सान ४२.नीर ४३.समता ४५.महाग ४६.वाणी ४७.मेथी ४९.सून ५०.नाट ५२.मेणा ५३.हय ५४.जलतरण ५६.शीर्ष ५७.तळ ५८.दहा ५९.हात ६०.टब ६१.वाट ६२.रदबदली ६४.लहान ६६.नार ६८.लग्न ६९.दाट ७०.धमनी ७१.नीज ७३.माया ७४.विकार ७६.कव ७९.मावशी ८२.रगड ८४.रसमलई ८७.आवड ८८.मुबलक ८९.फत्ते

### उभे उत्तरे

१.सुटसुटीत २.अवनी ४.प्रथा ५.पतकर ६.सिंह ७.गडी ९.अनेक ११.उभयचर १३.टपाल १४.टकळी १५.काला १६.भाजणी १८.पितर २२.बल २४.मानहानी २५.राजमाता २७.अहिंसा २८.सन २९.दंग ३१.सदरा ३३.वीरांगना ३५.दीनवाणा ३६.सारमेय ३७.रस ३९.कमनशीब ४४.महाल ४८.परत ५१.टवटवी ५२.मेहरबानी ५३.हळद ५४.जहाल ५५.तहान ५७.तबला ६०.टर ६३.लीलया ६५.हानिकारक ६६.नाटक ६७.सामसूम ७२.जमाव ७३.माशी ७५.रग ७७.वर ७८.रई ८०.वड ८१.आब ८३.डफ ८५.सध्या ८६.लक्ष्य



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### अर्जेंटिनाच्या कोचचं मोठं वक्तव्य, टीकाकारांना दिलं चोख उत्तर

**नवी दिल्ली**:फिफा वर्ल्ड कप २०२६ दरम्यान राउंड ऑफ १६ मध्ये इजिप्त विरुद्ध अर्जेंटिना यांच्यात सामना झाला. हा सामना अर्जेन्टिनाने ३–२ ने जिंकला आणि क्वाटर फायनलमध्ये स्थान मिळवलं. मात्र या सामन्यानंतर इजिप्तकडून अर्जेन्टिनावर मॅच फिक्सिंगचे आरोप झाले. मात्र या सगळ्यावर अर्जेंटिनाच्या कोचने सडेतोड उत्तर दिले. शनिवारी स्वित्झर्लंडविरुद्ध होणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या उपांत्यपूर्व सामन्यापूर्वी स्कॅलोनी यांनी म्हटले की, बाहेरचे टीकाकार त्यांच्या संघाचा पराभव पाहण्यासाठी आतुर आहेत.

काय म्हणाला अर्जेंटिनाचा कोच?

पत्रकारांशी बोलताना स्कॅलोनी यांनी मर्मॅच–फिक्सिंगच्या आरोपांकडे फारसे लक्ष दिले नाही; उलट, इतिहास केवळ स्वत:ची पुनरावृत्ती करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

### नोव्हाक जोकोविचचे २५व्यांदा ग्रँडस्लॅम जिंकण्याचे स्वप्न भंगले;

दिल्ली–३९ वर्षीय टेनिस दिग्गज नोव्हाक जोकोविचचे २५ वे ग्रँड स्लॅम विजेतेपद जिंकण्याचे स्वप्न पुन्हा एकदा भंगले आहे. विम्बल्डन चॅम्पियनशिपच्या उपांत्य फेरीत१५ वर्षांनी लहान असलेल्या २४ वर्षीय जॅनिक सिनरकडून सरळ सेट्समध्ये पराभूत झाला. सर्बियन जोकोविचने शेवटचे ग्रँड स्लॅम विजेतेपद तीन वर्षांपूर्वी २०२३ मध्ये जिंकले होते, जेव्हा तो यूएस ओपन चॅम्पियन होता. लंडनमधील ऑल इंग्लंड क्लबमध्ये इटलीच्या सिनरने जोकोविचचा ६–४, ६–४, ६–४ असा पराभव केला. सलग दुसऱ्या वर्षी तो अंतिम फेरीत पोहाचला आहे. जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या सिनरने गेल्या वर्षी स्पेनच्या कार्लोस अल्काराझचा पराभव केला होता. यावेळी, रविवारी सिनरचा सामना जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्हशी होईल. सिनरने उपांत्य फेरीत आक्रमक खेळ करत, जोकोविचचा सलग तीन सेट्समध्ये पराभव केला.

### ऑस्ट्रेलियात होणार आयपीएल चे सामने?

दिल्ली–क्रिकेट विश्वातील सर्वात श्रीमंत आणि लोकप्रिय टी–२० लीग असलेल्या इंडियन प्रीमियर लीग संदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. भविष्यात आयपीएलचे काही सामने भारताबाहेर, थेट ऑस्ट्रेलियात खेळवले जाऊ शकतात.

क्रिकेट ऑस्ट्रेलियाने भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला यासाठी खुले आमंत्रण दिल्याची माहिती समोर आली आहे. हा प्रस्ताव प्रत्यक्षात आला तर आयपीएलच्या इतिहासात प्रथमच परदेशी भूमीवर लीगचे सामने खेळवले जातील.

द सिडनी मॉर्निंग हेराल्डच्या वृत्तानुसार, क्रिकेट ऑस्ट्रेलियाने बीसीसीआयसमोर ऑस्ट्रेलियात आयपीएल सामने आयोजित करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. यासंदर्भात दोन्ही क्रिकेट बोर्डामध्ये प्राथमिक स्तरावर चर्चा सुरू असल्याचाही दावा या अहवालात करण्यात आला आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाला या कल्पनेला सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा आहे.

### वर्षाच्या अखेरीस टीम इंडिया करणार नेपाळचा दौरा

दिल्ली–भारतीय क्रिकेट संघ सध्या इंग्लंडच्या दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये एक टी–२० मालिका खेळवली जात आहे. ज्यात भारतीय संघाची कामगिरी निराशजनक होत आहे, भारतीय संघ मालिकेत ०–३ नं पिछाडीवर आहे. अशातच टी–२० मालिकेदरम्यान भारताच्या नेपाळ दौऱ्याची घोषणा करण्यात आली आहे. भारतीय पुरुष मअफ क्रिकेट संघ या वर्षाच्या अखेरीस, डिसेंबरमध्ये नेपाळचा दौरा करणार आहे. नेपाळ क्रिकेट असोसिएशननं १० जुलै रोजी याला दुजोरा दिला असून, दोन्ही संघांमध्ये तीन सामन्यांची टी–२० मालिका खेळवली जाईल. बीसीसीआय आणि नेपाळ क्रिकेट असोसिएशन यांच्या अधिकाऱ्यांमध्ये झालेल्या आयसीसीच्या वार्षिक परिषदेदरम्यान या मालिकेला दुजोरा देण्यात आला.

## क्रिकेट इतिहासात पहिल्यांदाच असं घडलं!

### इंग्लंडने २५७ धावांचा डोंगर उभारला

# ऐतिहासिक कामगिरीसह इंग्लंडचा ४–० ने मालिका विजय

**नवी दिल्ली:** भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात भारतीय संघाला दारुण पराभवाचा सामना करावा लागला आहे.

भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये ५ टी– २० सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा सामना साऊथॅम्पटनच्या मैदानावर पार पडला. भारतीय संघ या मालिकेत ०–३ ने पिछाडीवर होता. त्यामुळे अंतिम सामन्यात भारतीय संघाकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती. इंग्लंडच्या फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. पहिल्या डावात फलंदाजी करताना इंग्लंडने २५७ धावांचा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाने पूर्ण जोर लावला. पण भारताला हा सामना ५६ धावांनी गमवावा लागला आहे. यासह इंग्लंडने ही मालिका ४–० ने आपल्या नावावर केली.




इंग्लंडने भारतीय संघासमोर विजयासाठी मोठं आव्हान ठेवलं होतं. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघाला चांगल्या सुरुवातीची गरज होती. पण भारताला हवी तशी सुरुवात करता आली नाही. अभिषेक शर्मा अवघ्या ३ धावा करुन माघारी परतला. त्यानंतर संजू सॅमसनने २७ धावांचे योगदान दिले. इशान किशनने एका बाजून जोर लावला. त्याने ५६ धावांचे योगदान दिले. पण आदिल रशिदने त्याला बाद करत माघारी धाडलं. तर कर्णधार श्रेयस अय्यर या महत्वाच्या सामन्यात २८ धावा करुन माघारी परतला. शेवटी तिलक वर्माने अर्धशतकी खेळी केली. पण भारतीय संघाला २०१ धावांपर्यंत मजल मारता आली.

या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या इंग्लंडला फिल सॉल्ट स्वस्तात माघारी परतला. त्यानंतर जोस बटलर आणि हॅरी ब्रूकने मिळून विक्रमी भागीदारी केली. जोस बटलरने ६४ चेंडूंचा सामना करत १३१ धावांची खेळी केली. तर हॅरी ब्रूकने नाबाद ९५ धावा केल्या. जेकब बेथेल शून्यावर माघारी परतला. तर विल जॅक्सने नाबाद ७ धावा केल्या. यासह इंग्लंडने २० षटकांअखेर ३ गडी बाद २५७ धावांचा डोंगर उभारला. भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना शिवम दुबेने २ आणि प्रसिध कृष्णाने १ गडी बाद केला.


या मालिकेत भारतीय संघाकडून फ्लॉप शो पाहायला मिळाला. मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द झाला होता. त्यानंतर पुढील सर्व सामन्यांमध्ये भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. दुसरा सामना इंग्लंडने ४ गडी राखून आपल्या नावावर केला होता. त्यानंतर तिसऱ्या सामन्यात इंग्लंडने १२५ धावांनी विजय मिळवला होता. तर चौथ्या सामन्यात ९ गडी राखून बाजी मारली होती.

आता पाचव्या सामन्यात ५६ धावांनी विजय मिळवला आहे. यासह इंग्लंडने पहिल्यांदाच भारताविरुद्ध टी–२० मालिका जिंकली आहे.

## मराठमोळ्या सर्वेश कुशारेने मारली ऐतिहासिक उडी! पोडियमवर स्थान मिळवणारा ठरला पहिला भारतीय

दिल्ली–भारतीय उंच उडीपटू सर्वेश कुशारेने मोनाको डायमंड लीगमध्ये ऐतिहासिक कामगिरी केली. आपल्या डायमंड लीग पदार्पणातच, त्यानं उंच उडी स्पर्धेत तिसरे स्थान पटकावलं आणि पोडियमवर स्थान मिळवणारा तो पहिला भारतीय उंच उडीपटू ठरला. ३१ वर्षीय कुशारेसाठी तिसरे स्थान मिळवणे सोपे नव्हते, पण त्याने २.२६ मीटरच्या उडीसह तिसरे स्थान मिळवण्यात यश मिळवले. यासह, कुशारे एका विशेष क्लबमध्ये सामील झाला आहे.

अव्वल–३ मध्ये स्थान मिळवणारा चौथा भारतीय खेळाडू : सर्वेश कुशारे हा डायमंड लीगच्या इतिहासात अव्वल–३ मध्ये स्थान मिळवणारा चौथा भारतीय खेळाडू ठरला आहे. सर्वेशच्या आधी, नीरज चोप्रानं २०२२ पासून १३ वेळा, लांब उडीपटू मुरली श्रीशंकरनं २०२३ मध्ये एकदा आणि माजी थाळीफेकपटू विकास गौडानं डायमंड लीगच्या इतिहासात दोनदा अव्वल–३ मध्ये स्थान



मिळवलं आहे. सर्वेश कुशारेचा सध्याचा फॉर्म प्रभावी ठरला आहे. डायमंड लीग पदार्पणाच्या काही काळापूर्वीच, भुवनेश्वर इथं झालेल्या राष्ट्रीय आंतर–राज्य चॅम्पियनशिपमध्ये त्यानं तेजस्विन शंकरचा आठ वर्षे जुना २.२९ मीटरचा राष्ट्रीय विक्रम मोडत २.३१ मीटरचा नवीन राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला. या स्पर्धेत कुशारे तिसऱ्या स्थानी राहिला. त्याच्या पुढं कतारचा तीन वेळचा विश्वविजेता आणि टोकियो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता मुताझ एसा बार्शिम आणि अमेरिकेचा २०२३ विश्व चॅम्पियनशिप रौप्यपदक विजेता जुवॉन हॅरिसन यांसारखे स्टार खेळाडू होते.सर्वेश कुशारेनं पाचव्या प्रयत्नात पार केला २.२६ मीटरचा टप्पा : मोनॅको डायमंड लीगमध्ये, सर्वेश कुशारेनं आपल्या पहिल्याच प्रयत्नात २.१२ मीटरचा टप्पा पार केला. त्यानंतरच्या तीन प्रयत्नांमध्ये त्यानं अनुक्रमे २.१६ मीटर, २.२० मीटर आणि २.२३ मीटरचे प्रयत्न केले. सर्वेशनं आपल्या पाचव्या प्रयत्नात २.२६ मीटरचा टप्पा पार केला, परंतु सहाव्या प्रयत्नात तो २.२८ मीटरचा टप्पा पार करु शकला नाही. युक्रेनचा जागतिक इनडोअर चॅम्पियन ओलेह डोरोशचुकनं २.३२ मीटर उडी मारुन ही स्पर्धा जिंकली, तर ब्रिटनचा जॅक किमानी २.३० मीटर उडीसह दुसऱ्या स्थानी राहिला.

आता २३ जुलैपासून सुरु होणाऱ्या राष्ट्रकुल

## बीबीएल चा ओपनिंग सामना खेळण्यासाठी भारतात येणार का पाकिस्तानचे क्रिकेटर?

दिल्ली–बिग बॅश लीग २०२६–२७ चा ओपनिंग सामना भारतात खेळवला जाईल. क्रिकेट ऑस्ट्रेलिया आणि बीसीसीआयने संयुक्तपणे हे ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. हा सामना चेन्नईतील चेपॉक क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाईल. याची अधिकृत घोषणा ही भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या दोन दिवसीय ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर केली. मात्र या घोषणेनंतर चाहत्यांना प्रश्न पडलाय की बिग बॅश लीग खेळण्यासाठी पाकिस्तानचे खेळाडू भारतात येणार का?

बिग बॅश लीगच्या मागच्या सीजनमध्ये वेगवेगळ्या संघाकडून एकूण ७ पाकिस्तानी खेळाडू मैदानावर उतरले होते. या ७ पैकी अधिकतर पाकिस्तानी खेळाडू हे फ्लॉप ठरले. मात्र यावर अद्याप बिग बॅश लीगने कोणतीही अधिकृत माहिती दिली नाहीये. पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात राजकीय तणाव वाढला आणि परिणामी पाकिस्तानने त्यांचा क्रिकेट संघ भारतात सामने खेळण्यासाठी पाठवण्यास नकार दिला. त्यामुळे टी २० वर्ल्ड कप २०२६ मध्ये भारताकडे यजमानपद असताना सुद्धा पाकिस्तानचे सामने हे श्रीलंकेत आयोजित करण्यात आलेले. तसेच २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर आयपीएलमध्ये पाकिस्तानी खेळाडूंवर बंदी घालण्यात आली.

कधी खेळवला जाणार ओपनिंग सामना?

ऑस्ट्रेलिया क्रिकेटने शुक्रवारी बिग बॅश लीग २०२६–२७ चा ओपनिंग सामना हा १२ डिसेंबर रोजी खेळवला जाणार अशी घोषणा केली.

## डिसेंबरमध्ये टीम इंडियाचा नेपाळ दौरा; टी–२० मालिकेचे वेळापत्रक जाहीर

### बीसीसीआय चा मोठा निर्णय!

दिल्ली–भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आणि क्रिकेट असोसिएशन ऑफ नेपाळ यांनी द्विपक्षीय क्रिकेट संबंधांना आणखी बळ देणारा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार इंडिया ए संघ यंदाच्या डिसेंबरमध्ये नेपाळ दौऱ्यावर जाणार असून, दोन्ही संघांमध्ये तीन सामन्यांची टी–२० मालिका खेळवण्यात येणार आहे. शुक्रवारी उअछ ने अधिकृत निवेदन जारी करत या मालिकेचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले.

उअछ चे अध्यक्ष चतुर बहादूर चंद, सचिव पारस खडका आणि इउउख सचिव देवजीत सैकिया यांच्यात झालेल्या बैठकीनंतर या मालिकेवर शिक्कामोर्तब करण्यात आले. सर्व सामने नेपाळमधील कीर्तिपूर येथील त्रिभुवन विद्यापीठाच्या टीयू इंटरनॅशनल क्रिकेट ग्राउंडवर खेळवले जाणार आहेत.भारत विरुद्ध नेपाळ 'इंडिया ए' टी–२० मालिकेचं वेळापत्रक– ९ डिसेंबर – पहिला टी–२०, ११ डिसेंबर – दुसरा टी–२०, १३ डिसेंबर – तिसरा टी–२०, नेपाळसाठी सुवर्णसंधी– ही मालिका नेपाळ क्रिकेटसाठी मोठी संधी मानली जात आहे. 'इंडिया ए' संघात आयपीएलमध्ये चमक दाखवणारे अनेक युवा खेळाडू तसेच भारतीय वरिष्ठ संघासाठी खेळलेले काही अनुभवी क्रिकेटपटूही असण्याची शक्यता आहे.

## १४२ वर्षांची परंपरा मोडली, लॉर्ड्सवर महिलांना का होती प्रवेशबंदी? महिलांनी गाठला नवा टप्पा

दिल्ली–भारत विरुद्ध इंग्लंड महिला संघाचा पहिला ऐतिहासिक सामना हा काल १० जुलै रोजी खेळवण्यात आला, हा सामना १४२ वर्षांनी पहिल्यांदा लॉर्ड्स क्रिकेट ग्राउंडवर खेळवण्यात आला. हो खरं आहे, १० जुलै २०२६ रोजी, पहिल्यांदाच महिला क्रिकेट संघ येथे कसोटी सामना खेळवण्यात आला. यजमान इंग्लंड आणि भारतीय महिला क्रिकेट संघाने या सुंदर मैदानातील हिरव्यागार गवतावर पाऊल ठेवताच इतिहासाच्या पानांवर आपली संयुक्त स्वाक्षरी केली. महिला क्रिकेटसाठी हा खुप महत्वाचा क्षण होता. पण तुम्हला माहिती आहे का महिलांना लॉर्ड्समध्ये प्रवेश करण्यास बंदी का घालण्यात आली होती. याबद्दल सविस्तर माहिती या लेखामध्ये तुम्हाला आम्ही देणार आहोत.

महिलांना लॉर्ड्समध्ये प्रवेश करण्यास बंदी का होती?

२०० वर्षांहून अधिक काळ, मेरीलेबोन क्रिकेट क्लब आणि त्याच्या प्रसिद्ध लॉर्ड्स पॅव्हेलियनमध्ये महिलांना पूर्णपणे प्रवेश नाकारण्यात आला होता. ही बंदी अखेर सप्टेंबर १९९८ मध्ये उठवण्यात आली. मार्च १९९९ पर्यंत, क्लबने परंपरा मोडून महिला मानद सदस्यांच्या पहिल्या गटाला 'लाँग रूम'मध्ये प्रवेश दिला. आता, २७ वर्षांनंतर, तिथे महिलांचा एक कसोटी सामना खेळवला जाणार आहे. लॉर्ड्सच्या प्रशासनाने त्यांच्या खोलवर रुजलेल्या संस्थात्मक लिंगभेदामुळे महिला क्रिकेटपेक्षा पुरुष क्रिकेट, पुरुषांचे काउंटी क्रिकेट आणि कॉर्पोरेट कार्यक्रमांना मुद्दाम प्राधान्य दिले. या मैदानावर लॉर्ड्स क्रिकेट ग्राउंडवर पहिला महिला सामना १९७३ मध्ये झाला होता. तो पांढऱ्या चेंडूचा सामना होता, ज्यासाठी तत्कालीन कर्णधार रेचेल फ्लिंट यांनी प्रशासनाशी सुमारे ३ वर्षे लढा दिला होता. याबद्दल आणखी सत्य सांगायचे झाले तर परंतु २०२३ मध्ये 'इंडिपेंडंट कमिशन फॉर इक्विटी इन क्रिकेट'चा अहवाल आला, ज्यामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते की, 'होम ऑफ क्रिकेट' असलेल्या प्रतिष्ठित लॉर्ड्सच्या मैदानावर इंग्लंडचा महिला संघ न खेळणे हे अत्यंत धक्कादायक आहे आणि हे स्पष्टपणे दिसून येते की हे मैदान प्रामुख्याने पुरुषांसाठीच आहे इतक्या सार्वजनिक टीकेनंतर आणि छाननीनंतर अखेर आता भारत आणि इंग्लंडच्या महिला संघातील पहिली कसोटी लॉर्ड्सच्या या ऐतिहासिक मैदानावर होत आहे. महिला आणि पुरुष क्रिकेटमध्ये कोणते वेगळे नियम आहेत? पुरुष आणि महिलांच्या कसोटी क्रिकेटमध्येही फरक आहेत.

महिलांचे कसोटी सामने पाच दिवसांऐवजी चार दिवस खेळले जातात. पुरुषांच्या कसोटी सामन्यांमध्ये दररोज ९० षटके टाकणे आवश्यक असते. महिलांच्या कसोटी सामन्यांमध्ये, दररोज किमान १०० षटके टाकणे बंधनकारक असते आणि फॉलो–ऑनचे लक्ष्य २०० धावांऐवजी १५० धावांचे असते. आतापर्यंत फक्त दोन महिलांचे पाच दिवसीय कसोटी सामने खेळले गेले आहेत. यातील सर्वात अलीकडील सामना २०२३ मध्ये ट्रेंट ब्रिज येथे खेळला गेलेला महिलांचा ॲशेस कसोटी सामना होता.

# फिफा वर्ल्ड कपमध्ये आज नॉर्वे विरुद्ध इंग्लंड तर मेस्सीच्या अर्जेंटिनासमोर स्वित्झर्लंडचे आव्हान

दिल्ली–स्पेन आणि फ्रान्सनं फिफा विश्वचषक २०२६ च्या उपांत्य फेरीत आपलं स्थान आधीच निश्चित केलं आहे. उर्वरित दोन संघ इंग्लंड आणि नॉर्वे यांच्यातील सामना, तसंच अर्जेंटिना आणि स्वित्झर्लंड यांच्यातील सामन्याच्या विजेत्यांवरुन ठरतील. दोन्ही सामन्यांचे विजेते उपांत्य फेरीत एकमेकांविरुद्ध खेळतील. त्यामुळं, सर्वांचं लक्ष या सामन्यांवर असेल. नॉर्वे आणि इंग्लंड यांच्यातील सामना १२ जुलै रोजी भारतीय वेळेनुसार पहाटे २:३० वाजता खेळला जाईल, तर अर्जेंटिना आणि स्वित्झर्लंड यांच्यातील सामना १२ जुलै रोजी भारतीय वेळेनुसार सकाळी ६:३० वाजता खेळला जाईल.

नॉर्वे आणि इंग्लंड यांच्यातील विश्वचषकातील चौथा सामना : नॉर्वे आणि इंग्लंड यांच्यात आतापर्यंत एकूण १२ आंतरराष्ट्रीय सामने खेळले गेले आहेत. यापैकी इंग्लंडनं सात सामने जिंकले आहेत, तर नॉर्वेनं दोन जिंकले असून तीन सामने अनिर्णित राहिले आहेत. फिफा विश्वचषकात हे दोन संघ प्रथमच एकमेकांविरुद्ध खेळतील. नॉर्वे उत्कृष्ट फॉर्ममध्ये असून, त्यांनी पाचपैकी चार सामने जिंकले आहेत.

### कोणाला मिळणार सेमीफायनलचं तिकिट?

त्यांचा एकमेव पराभव गट फेरीत फ्रान्सविरुद्ध झाला होता. गट फेरीत नॉर्वेने इराकला ४–१ आणि सेनेगलला ३–२ नं पराभूत केलं होतं. राऊंड ऑफ ३२ मध्ये, संघानं आयव्हरी कोस्टला २–१ नं हरवलं. त्यानंतर, राऊंड ऑफ १६ मध्ये, त्यांनी पाच वेळच्या चॅम्पियन ब्राझीलला २–१ नं हरवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

इंग्लंड संघ अपराजित : इंग्लंडनं या विश्वचषकात एकही सामना गमावलेला नाही. संघानं आपल्या पाचपैकी चार सामने जिंकले आणि एक सामना अनिर्णित राहिला. गट टप्प्यात, त्यांनी क्रोएशियाला ४–२ आणि पनामाला २–० नं हरवलं. घानाविरुद्धचा सामना ०–० असा अनिर्णित राहिला. राऊंड ऑफ ३२ मध्ये, इंग्लंडनं काँगो डीआरचा सामना केला आणि २–१ नं विजय मिळवला. राऊंड ऑफ १६ मध्ये, त्यांनी मेक्सिकोला ३–२ नं हरवून अंतिम आठमध्ये प्रवेश केला. नॉर्वे पुन्हा



एकदा गोलसाठी अर्लिंग हालंडवर अवलंबून असेल. तर दुसरीकडे, इंग्लंडच्या आक्रमणाची जबाबदारी कर्णधार हॅरी केनवर असेल. या दोन्ही खेळाडूंच्या कामगिरीवर या सामन्याचा निकाल अवलंबून असू शकतो.

अर्जेंटिना आणि स्वित्झर्लंड विश्वचषकात तिसऱ्यांदा आमनेसामने : अर्जेंटिना आणि स्वित्झर्लंड यांच्यात सात आंतरराष्ट्रीय सामने झाले आहेत. अर्जेंटिनानं त्यापैकी पाच सामने जिंकले आहेत आणि दोन अनिर्णित राहिले आहेत. स्वित्झर्लंडनं इंग्लंडला कधीही पराभूत केलेलं नाही. फिफा विश्वचषकात हे दोन संघ तिसऱ्यांदा आमनेसामने येतील. त्यांची पहिली भेट १९६६ च्या विश्वचषकात झाली होती, जिथं अर्जेंटिनानं स्वित्झर्लंडला २–० नं पराभूत केलं होतं. २०१४ च्या विश्वचषकात अर्जेंटिनानं १–० नं विजय मिळवला होता.

अर्जेंटिनानं जिंकले सर्व सामने : गतविजेता अर्जेंटिना या स्पर्धेत अपराजित असून, त्यांनी आपले सर्व पाचही सामने जिंकले आहेत. गट टप्प्यात, अर्जेंटिनानं अल्जेरियाला ३–०, ऑस्ट्रियाला २–० आणि जॉर्डनला ३–१ नं पराभूत केलं. ३२ संघांच्या फेरीत, संघानं केप व्हर्डेचा सामना केला आणि ३–२ नं विजय मिळवला. त्यानंतर, १६ संघांच्या फेरीत, त्यांनी इजिप्तला ३–२ नं पराभूत करुन उपांत्यपूर्व फेरी गाठली. स्वित्झर्लंडनं कोलंबियाला पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभूत केलं : स्वित्झर्लंडनंही या विश्वचषकात एकही सामना गमावलेला नाही. संघानं पाच सामन्यांमध्ये चार विजय आणि एक बरोबरी नोंदवली आहे. गट टप्प्यात, त्यांनी बोस्नियाला ४–१ आणि कॅनडाला २–१ नं पराभूत केलं. कतारविरुद्धचा सामना १–१ असा बरोबरीत संपला. राऊंड ऑफ ३२ मध्ये स्वित्झर्लंडनं अल्जेरियाला २–० नं हरवलं. राऊंड ऑफ १६ मध्ये कोलंबियाविरुद्धचा सामना पूर्ण वेळेपर्यंत ०–० असा बरोबरीत राहिला. त्यानंतर स्वित्झर्लंडनं पेनल्टी शूटआऊटमध्ये ४–३ नं विजय मिळवला.

मेस्सी विरुद्ध स्वित्झर्लंडचा बचावात सामना : अर्जेंटिना कर्णधार लिओनेल मेस्सीकडून आणखी एका गोलच्या शोधात असेल. जर तो स्वित्झर्लंडचा बचाव भेदण्यात यशस्वी झाला, तर हा सामना अर्जेंटिनासाठी सोपा होईल. मागील सामन्यात गोल करणारे एन्झो फर्नांडिस आणि रोमेरो हे देखील स्वित्झर्लंडसाठी धोकादायक ठरु शकतात. दुसरीकडे, अर्जेंटिनाचा हल्ला रोखण्यासाठी स्वित्झर्लंड आपला कर्णधार ग्रॅनिट झाकावर अवलंबून असेल. याव्यतिरिक्त, योहान मझांबीकडूनही गोलची अपेक्षा असेल. त्यानं या स्पर्धेत ३ गोल केले आहेत.

## विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजीमध्ये बीसीए स्क्रुटिनी सेंटर कार्यरत

**लातूर/प्रतिनिधी:** विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी , लातूर येथे बीसीए प्रवेशासाठी अधिकृत स्क्रुटिनी सेंटर कार्यरत करण्यात आले असून महाविद्यालयात बीसीए प्रवेश प्रक्रियेलाही सुरुवात झाली आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष मार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेअंतर्गत या केंद्रावर विद्यार्थ्यांच्या अर्जांची पडताळणी, आवश्यक कागदपत्रांची छाननी, अर्जातील त्रुटींची पूर्तता तसेच प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील सर्व प्रकारचे मार्गदर्शन विनामूल्य उपलब्ध करून दिले जात आहे. बीसीए प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणीची अंतिम तारीख १६ जुलै २०२६ असल्याने पात्र विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घेऊन वेळेत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

महाविद्यालयातील बीसीए अभ्यासक्रमासाठी बारावी कला, वाणिज्य किंवा विज्ञान शाखा उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेशास पात्र आहेत. तसेच एमएचटी-सीईटी नॉन-झिरो स्कोअर (पीसीबी / पीसीम ) किंवा एमएएच-बीसीए सीईटीमध्ये नॉन-झिरो स्कोअर मिळविलेल्या विद्यार्थ्यांनाही प्रवेशासाठी पात्रता आहे. त्यामुळे कला, वाणिज्य आणि विज्ञान या तिन्ही शाखांतील विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर घडविण्याची उत्तम संधी उपलब्ध झाली आहे. महाविद्यालयात मुलींसाठी शासनाच्या धोरणानुसार मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध असून, पात्र विद्यार्थ्यांना राज्य शासनामार्फत देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांचाही लाभ मिळणार आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सुलभ पद्धतीने उच्च शिक्षण घेण्याची उत्तम संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, आलमला संस्थेने लातूर शहरातील शिवकमल सिल्व्हर आर्च, नांदी स्टॉप येथे स्वतंत्र प्रवेश मार्गदर्शन व स्क्रुटिनी सहाय्य कार्यालय सुरू केले आहे. या कार्यालयात ऑनलाइन अर्ज भरणे, कागदपत्रांची पडताळणी, स्कॅनिंग व अपलोडिंग, प्रवेशासंबंधी मार्गदर्शन, समुपदेशन तसेच विद्यार्थी व पालकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी अनुभवी कर्मचारी उपलब्ध आहेत. त्यामुळे ग्रामीण भागासह लातूर शहरातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया सुलभ व वेळेत पूर्ण करता येणार आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. किशोर जेवे यांनी सांगितले की, प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी स्क्रुटिनी सेंटर तसेच प्रवेश मार्गदर्शन कार्यालयात प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. अर्ज भरण्यापासून कागदपत्र पडताळणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर विद्यार्थ्यांना विनामूल्य मार्गदर्शन केले जात असून, विद्यार्थी व पालकांनी कोणत्याही संभ्रमात न राहता या सुविधेचा लाभ घ्यावा.

संस्थेचे सचिव बसवेश्वर धाराशीवे यांनीही विद्यार्थ्यांना आवाहन करताना सांगितले की, बीसीए व एमसीए प्रवेशासाठी आवश्यक सर्व कागदपत्रांसह विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील स्क्रुटिनी सेंटर अथवा नांदी स्टॉप येथील प्रवेश मार्गदर्शन कार्यालयाला भेट द्यावी. शासनाने उपलब्ध करून दिलेल्या प्रवेश प्रक्रियेतील सुविधांचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. विशेषतः बीसीए प्रवेशासाठी नोंदणीची अंतिम तारीख १६ जुलै २०२६ असल्याने पात्र विद्यार्थ्यांनी विलंब न करता प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उज्ज्वल करिअरची संधी साधावी, असे आवाहन केले.

# ज्येष्ठ नागरिकांच्या तीर्थदर्शन यात्रेच्या इच्छापूर्तीचा मनस्वी आनंद - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### नागपूर येथून मुख्यमंत्री तीर्थदर्शन यात्रेचा शुभारंभ




**नागपूर/प्रतिनिधी:** भगवान गौतम बुद्धाच्या विचाराचे प्रेरणास्त्रोत म्हणून आपण बोधगया येथे जातो. एकदा तरी तेथे जाऊन दर्शन घेण्याची ओढ भाविकांमध्ये असते. ज्येष्ठ नागरिकांच्या दर्शनाची इच्छा पूर्ण व्हावी, या दृष्टीने आपण मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरु केली. नागपूर येथून या योजनेअंतर्गत यावर्षी सुमारे ८०० भाविकांना जाता येत आहे, याचा मनस्वी आनंद असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नागपूर रेल्वे स्थानक येथून बोधगयेकडे जाणाऱ्या भाविकांच्या पहिल्या चमूला शुभेच्छा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विशेष समारंभात ते बोलत होते. यावेळी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट, वित्त व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, महापौर नीता ठाकरे, आमदार सर्वश्री कृष्णा खोपडे, संजय मेश्राम, समीर मेघे, चरणसिंह ठाकूर, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुळकर्णी, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे व वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

अनेक ज्येष्ठ नागरिकांना आपल्या श्रद्धेच्या तीर्थस्थळी जाऊन दर्शन घेण्याची तीव्र इच्छा असते. आर्थिक, शारीरिक आणि कौटुंबिक अडचणींमुळे त्यांची ही इच्छा पूर्ण होणे अशक्यप्राय होऊन जाते. अशा गरजू ज्येष्ठ नागरिकांना आपल्या तीर्थस्थळाच्या दर्शनाची इच्छा पूर्ण होता यावी, या दृष्टीने आम्ही ही योजना आकारास आणली. आज या योजनेअंतर्गत असंख्य भाविकांना त्याचा लाभ होत आहे. सामाजिक न्याय विभागाने अतिशय उत्तमरित्या ही योजना राबविल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गौरवोद्गार काढले.

भाविकांच्या इच्छापूर्तीचा आनंद ही योजना यशस्वी झाल्याची पावती आहे. या यात्रेत कोणत्याही वृद्ध भाविकांची गैरसोय होऊ नये, या दृष्टीने सामाजिक न्याय विभागाने काळजी घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आपण लवकरच बोधगया येथे महाराष्ट्रातील भाविकांसाठी मोठे संकुल निर्माण करीत असल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी देऊन भाविकांना शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट व मान्यवरांच्या हस्ते बोधगया येथे भाविकांना घेऊन जाणाऱ्या विशेष रेल्वेला हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले.

## राजा नारायणलाल लाहोटी शाळेत स्पर्धा परीक्षांतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव




**लातूर/प्रतिनिधी :** विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचा नावलौकिक वाढविणाऱ्या विद्यार्थ्यांचा शनिवारी (दि. ११ जुलै) शाळेचे प्राचार्य कर्नल एस. श्रीनिवासुलू यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर भविष्यातही अधिक उंच शिखरे गाठावीत, असा संदेश दिला.

यावेळी आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाड (खचज) द्वितीय स्तर परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. इयत्ता चौथीचा श्लोक देशपांडे, इयत्ता सातवीचा ईशान अग्रवाल तसेच इयत्ता दहावीचा वेदांत गोरे यांचा गौरव करण्यात आला. विशेष म्हणजे वेदांत गोरे याने महाराष्ट्र झोनमध्ये प्रथम क्रमांक तर आंतरराष्ट्रीय स्तरावर १५ वा क्रमांक मिळवत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. त्याला सुवर्णपदक तसेच ५,००० चे रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले.

महाराष्ट्र शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या इयत्ता सहावीच्या हिंदवी अरण्ये हिचाही यावेळी विशेष गौरव करण्यात आला.

तसेच महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा २०२५-२६ मध्ये यश मिळविणाऱ्या रोमित दर्शन खटोड, शिवांश राहुल माळी, अर्जुन श्रीकांत नागुरे, हर्षवर्धन विद्यासागर बहेती, श्लोक स्वप्नीलकुमार देशपांडे, स्वरा गणेश कोल्हे, कुणाल रवी पवार, समरजीत सचिन शिंदे, अरहान सलीम मुल्ला, अवनी दीपक पल्लोड, अनिश महेश वालसंगे तसेच आरुष आलोक दुबे या विद्यार्थ्यांचाही यथोचित सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी प्राचार्य कर्नल श्रीनिवासूलू , रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर, उपप्राचार्या रीना नायर, वरिष्ठ समन्वयक मनोहर कबाडे, प्राथमिक विभाग प्रमुख अरुल सेल्वी, स्पर्धा परीक्षा विभागातील शिक्षक राजेंद्र कांबळे व दर्शन देशपांडे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## अनुसूचित जाती आरक्षणाचे दोन गटात उपवर्गीकरण करा: सचिन बगाडे



**लातूर/प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातीचे अ, ब, क, ड असे वर्गीकरण करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले आहेत. परंतु, आरक्षण वर्गीकरण कृती समितीने त्याचे दोन गटात उपवर्गीकरण करण्याची मागणी लातुरात आयोजित पत्रकार परिषदेत शनिवारी केली. यावेळी समितीचे निमंत्रक सचिन बगाडे, संयोजक अरविंद पाटोळे, नागेश गायकवाड आदी उपस्थित होते.

आरक्षण वर्गीकरण मुद्द्याला घेऊन बगाडे व त्यांचे सहकारी पुणे येथून संपूर्ण महाराष्ट्रात आपली भूमिका मांडत असून, त्यानुसार त्यांनी शनिवारी लातूर पत्रकार परिषद घेतली. पत्रकारांशी संवाद साधताना बगाडे म्हणाले, राज्यात अनुसूचित जाती सामाजिक शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या एकसंघ नसून त्या विविध स्तरांत विभागल्या आहेत. प्रत्यक्षात काही मोठ्या जातींनी आरक्षणाचा मोठा लाभ घेतला असून, मातंग व तत्सम जाती आजही सर्व क्षेत्रात मागे राहिल्या आहेत. त्यामुळे उपवर्गीकरण करणे काळाची गरज आहे.

कर्नाटक सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर उपवर्गीकरणाची अंमलबजावणी केली आहे. विशेषतः हरियाणा राज्याने वंचित आणि अल्प प्रतिनिधित्व या निकषावर आधारित दोन गटांची प्रभावी रचना केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र सरकारने अनुसूचित जातींचे दोन गट उपवर्गीकरणात करणे आवश्यक आहे. त्यात वंचित अनुसूचित जाती आणि इतर अनुसूचित जाती असा त्याचा प्रवर्ग असावा, असे बगाडे यांनी सांगितले.

उपवर्गीकरणाची सविस्तर मांडणी करताना बगाडे म्हणाले,
अनुसूचित जातीसाठी असलेल्या १३ टक्के आरक्षणापैकी सहा टक्के आरक्षण वंचित अनुसूचित जातीसाठी राखीव ठेवावे, उर्वरित सात टक्के आरक्षण इतर अनुसूचित जातीसाठी ठेवण्यात यावे. जर एका गटात पात्र उमेदवार उपलब्ध नसेल तर दुसऱ्या गटातील उमेदवारास संधी देण्यात यावी. शैक्षणिक प्रवेशात दोन्ही गटांना प्रत्येकी सहा टक्के आरक्षण लागू करावे. उपवर्गीकरणानंतर पहिली रिक्त जागा वंचित अनुसूचित जातीसाठी देण्यात यावी.

आरक्षणाची दोन गटात विभागणी झाल्यानंतर समाजातील विषमता कमी करून खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय प्रस्थापित होईल, असा दावाही यावेळी बगाडे यांनी केला.

## अ . भा. भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने लातूर आरटीओ कार्यालयावर भव्य मोर्चा




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर आरटीओ कार्यालयाच्या अधिकाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या भ्रष्टाचार व चुकीच्या कारवाईच्या निषेधार्थ अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्या नेतृत्वाखाली डोक्यावर एका टोपल्यात दोन कोंबड्या, दारूच्या बाटल्या व चिल्लर पैसे घेऊन भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आरटीओ कार्यालयाकडून वाहनधारकांची केली जाणारी अडवणूक व आर्थिक लुट थांबविण्यात यावी अशी मागणी वारंवार करूनही संबंधित विभागाचे अधिकारी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याच्या निषेधार्थ डोक्यावर एका टोपल्यात दोन कोंबड्या, दारूच्या बाटल्या व चिल्लर पैसे घेऊन हा आगळा वेगळा मोर्चा काढण्यात आला. मोर्चात सहभागी झालेल्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करून वाहनधारकांची अडवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांची गाढवावरून धिंड काढण्याची जाहीर धमकी दिल्यामुळे भेदरलेला एकही अधिकारी मोर्चास सामोरा आला नाही. त्यामुळे संतप्त मोर्चेकऱ्यांनी तब्बल दोन तास आरटीओ कार्यालयासमोर ठिय्या धरला. शेवटी पोलीस अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून आरटीओ अधिकाऱ्यांना मोर्चासमोर आणले. त्यावेळी अध्यक्ष खंडापूरकर यांनी अधिकाऱ्यांना एक महिन्यात कामकाजात सुधारणा नाही केल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा इशारा दिला.

अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने आयोजित केलेल्या या मोर्चामुळे बराच काळ आरटीओ कार्यालय परिसरातील वातावरण तणावपूर्ण बनले होते. या मोर्चात राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर बाबा यांच्यासह राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य पृथ्वीराजसिंह पाटील खंडापूरकर, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा विधी विभाग एड. राणीताई स्वामी, राष्ट्रीय सरचिटणीस अमोल नानजकर काशीबाई हांडे, शिवा काळे, नेताजी जाधव, पृथ्वीराज पवार, नागेश जाधव, सुनील शिंदे, अजय राठोड,वैभव घोबाळे, रेखा खंदाडे, साक्षी भातलवंडे ,सुनील कदम, महेश पाटील, यांसह परभणी, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, सोलापूर जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते, वाहनधारक - वाहन चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जोरदार पावसापूर्वी लातूर शहरातील सर्व १८ प्रभागांत नालेसफाई व रस्ते दुरुस्तीची कामे पूर्ण करा - आश्विन नलबले




**लातूर/प्रतिनिधी:** पावसाळ्याच्या सुरुवातीच्या पावसानंतर लातूर शहरातील अनेक भागांत पाणी साचणे, नाल्या व गटारे तुंबणे, रस्त्यांवर चिखल व खड्डे निर्माण होणे, तसेच वाहतूक विस्कळीत होण्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात समोर आल्या आहेत. पुढील जोरदार पावसापूर्वी लातूर महानगरपालिका हद्दीतील सर्व १८ प्रभागांमध्ये नालेसफाई, पाणी निचरा, रस्ते दुरुस्ती आणि पावसाळी पूर्वतयारीची कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी आम आदमी पार्टीचे लातूर जिल्हाध्यक्ष आश्विन नलबले यांनी आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. ही समस्या केवळ काही भागांपुरती मर्यादित नसून संपूर्ण शहरातील प्रमुख रस्ते, अंतर्गत रस्ते, नाले, गटारे, ड्रेनेज लाईन्स आणि पाणी साचणारे संवेदनशील भाग यांची तातडीने पाहणी करणे आवश्यक असल्याचे नलबले यांनी म्हटले आहे. सध्या पाऊस नसला तरी पुढील जोरदार पावसापूर्वी कामे पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडे पुरेसा वेळ आहे. मात्र, ही कामे रखडल्यास पुन्हा पाणी साचणे, वाहतूक कोंडी, चिखल, खड्डे आणि अपघाताचा धोका निर्माण होईल, असेही त्यांनी नमूद केले.नागरिकांनी गावभाग परिसरातील गोदावरी देवी कन्या हायस्कूल, सावळे निवास, बालाजी मंदिर परिसर मेन रोड, पटेल चौक-नांदगाव वेस, गंजगोलाई, सुभाष चौक-पापनाश रोड, सेंट्रल हनुमान, यशवंत रोड, खडक हनुमान मंदिर परिसर, दयाराम रोड आणि मिलिंद नगर येथील समस्या निदर्शनास आणल्या आहेत. तसेच माताजी नगर-पोस्टल कॉलनी, प्रभाग क्रमांक १८, खोरी गल्ली प्रभाग क्रमांक ९, देशमुख नगर-एलआयसी कॉलनी, दुर्गा देवी चौक-अथर्व डेव्हलपर्स परिसर, डी-मार्ट रोड ब्रिज परिसर आणि प्रभाग क्रमांक १५ मधील रस्ते व नालेसफाईच्या समस्या नागरिकांनी मांडल्या आहेत.ही ठिकाणे केवळ उदाहरणे असून महानगरपालिकेने केवळ निवडक भागांपुरती कार्यवाही न करता सर्व १८ प्रभागांमध्ये प्रत्यक्ष सर्वेक्षण करून प्रभागनिहाय पावसाळी पूर्वतयारी मोहीम राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# पोदार जागतिक लोकसंख्या दिवस मोठ्या उत्साहात साजरा




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- पोदार इंटरनॅशनल स्कूल धाराशिव मध्ये स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करून कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना वाढती लोकसंख्या, तिचा पर्यावरण, आरोग्य, शिक्षण व नैसर्गिक साधनसंपत्तीवर होणारा परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर लोकसंख्या नियंत्रणाचे महत्त्व, कुटुंब नियोजन, स्त्री-पुरुष समानता, आरोग्यदायी जीवनशैली आणि शाश्वत विकास यासंदर्भात विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांनी आपल्या मार्गदर्शनातून प्रत्येक नागरिकाने लोकसंख्या वाढीचे सामाजिक व आर्थिक परिणाम समजून घेऊन जबाबदार नागरिक म्हणून आपली भूमिका पार पाडावी, असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन इयत्ता सहावीच्या वर्गशिक्षिका आयेशा मोमीन मॅडम व कार्यक्रमाधिकारी सुप्रिया राहीगुडे मॅडम यांनी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने केले. या

कार्यक्रमास स्कूलचे उपप्राचार्य निलेश जाधव सर, व्यवस्थापकीय अधिकारी जीवन कुलकर्णी सर, प्रदीप शिंदे सर व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोयाबीन पेरणीसाठी उरले अवघेच ५ दिवस; उडीद, मुगाची मुदत संपली: १५ जुलैनंतर सोयाबीनमध्ये तूर आंतरपीकाचा कृषी विभागाचा सल्ला

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- यंदा मान्सून उशिराने दाखल झाल्याने जिल्ह्यात खरीप पेरणीला विलंब होत आहे. १० जुलैपर्यंत जिल्ह्यातील ५ लाख ५४ हजार हेक्टर क्षेत्रापैकी केवळ २ लाख २९ हजार हेक्टरवर पेरणी झाली असून, पेरणीची टक्केवारी ४१ इतकीच आहे. दरम्यान, पावसानेही उघडीप दिल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. मूग व उडीद पेरणीची मुदत संपली असून, सोयाबीन पेरणीसाठी शेतकऱ्यांच्या हाती अवघे पाच दिवस शिल्लक आहेत. त्यानंतर उत्पादनाचा ताळमेळ साधण्यासाठी शेतकऱ्यांना सोयाबीनमध्ये तूर आंतरपीक घ्यावे लागणार आहे.

गतवर्षी मान्सून वेळेवर दाखल झाल्याने १० जुलैपर्यंत ८० टक्के पेरणी झाली होती. या वर्षी मान्सून उशिराने दाखल झाला आहे. शिवाय, जून महिन्यात सर्वदूर पाऊस झाला नव्हता. जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या पावसामुळे पेरणीस वेग आला आहे. ५ लाख ५४ हजार हेक्टर पैकी २ लाख २९ हजार हेक्टरवर पेरा झालेला आहे. मूग, उडीद पेरणीचा कालावधी ३० जूनला संपला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आता मूग, उडीद पीक घेण्याची संधी हुकली आहे. आता शेतकरी सोयाबीन पेरणीवर भर देत आहेत. सोयाबीन पेरणीसाठी १५ जुलैची डेडलाईन कृषी तज्ज्ञांनी दिली आहे. त्यामुळे शेतकरी पेरणी उरकून घेण्यात व्यस्त झाले आहेत. १५ जुलैनंतर शेतकऱ्यांना सोयाबीन पिकात तूर आंतरपीक घ्यावे लागणार आहे. पेरणी व पिकांसाठी आता मोठ्या पावसाची गरज आहे. डॉ. सचिन सूर्यवंशी, मृदा व जलव्यवस्थापन तज्ज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, तुळजापूर

तालुकानिहाय पेरणीची टक्केवारी

येथील हवामान व मातीला पोषक असलेल्या वाणांची आता पेरणीसाठी निवड करावी लागणार आहे. सोयाबीन पेरणी करताना आंतरपीक तूर घ्यावे, बाजरी पिकामध्ये तूर आंतरपीक घेता येईल. जेणेकरून शेतकऱ्यांचा आर्थिक नुकसान टळण्यास मदत होईल.

अलनिनोमुळे मान्सून उशिरा दाखल झाला. बेंबळी,पाडोळी, ढोकी महसूल मंडळ, तुळजापूर तालुक्यातील जळकोट, नळदुर्ग, सावरगाव, लोहारा तालुका व उमरगा तालुक्यातील डाळींब, मुरुम महसूल मंडळात कमी पाऊस झाल्याने त्या भागात पेरणी कमी झालेली आहे. १५ जुलैपर्यंत सोयाबीन पेरणी करावी, त्यानंतर पेरणी करायची असेल तर तूर आंतरपीक घ्यावे. २०१५ मध्ये ५५ टक्केच पाऊस झाला होता. त्यामुळे तूर आंतरपिकामुळे शेतकऱ्यांना फटका बसला नव्हता. महादेव असलकर, उपविभागीय कृषी अधिकारी यांनी सांगितले.

# भूम शिवारामध्ये सोयाबीनवर अळीचा प्रादुर्भाव, कोवळ्या रोपांचे नुकसान

भूम(प्रतिनिधी)-तालुक्यात अनेक ठिकाणी सोयाबीन पिकावर पैशाच्या आळीचा (मिलिपीड) प्रादुर्भाव आढळून आला असून, नुकत्याच उगवलेल्या सोयाबीनच्या कोवळ्या रोपांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. आळीमुळे रोपे कुरतडली जात असून काही शेतकऱ्यांवर दुबार पेरणी करण्याची वेळ आली आहे.

यंदा सतत पाऊस नसला तरी झालेल्या पावसामुळे जमिनीत निर्माण झालेल्या ओलाव्यामुळे पैशाच्या आळीचा प्रादुर्भाव वाढल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या किडीने उगवलेल्या सोयाबीनच्या कोवळ्या रोपांचे नुकसान केले असून, अनेक ठिकाणी सोयाबीनची उगवण कमी झाली आहे. त्यामुळे उत्पादनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.सध्याचे ओलसर वातावरण आणि शेतातील सेंद्रिय अवशेषांमुळे या आळीची संख्या झपाट्याने वाढल्याचे शेतकरी सांगत आहेत. वाढलेला शेती खर्च, अनिश्चित हवामान आणि आता किडीच्या प्रादुर्भावामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. यामुळे प्रशासनाच्यावतीने शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून त्यांना किडीच्या नियंत्रणासाठी मार्गदर्शन करण्याची मागणी होत आहे.

प्रादुर्भाव आढळल्यास तातडीने संपर्क करा याबाबत तालुका कृषी अधिकारी अतुल ढवळे यांनी सांगितले की, तालुक्यात काही ठिकाणी सोयाबीन पिकामध्ये पैशाच्या आळीचा (मिलिपीड) प्रादुर्भाव झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

शेतकऱ्यांनी घाबरून न जाता आपल्या शेताची नियमित पाहणी करावी. प्रादुर्भाव आढळल्यास तातडीने कृषी सहाय्यक किंवा मंडळ कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. कृषी विभागामार्फत शेतांची पाहणी करून आवश्यक मार्गदर्शन करण्यात येत आहे. शिफारशीनुसारच कीड नियंत्रणाच्या उपाययोजना कराव्यात. आवश्यक असल्यास संबंधित शेतकऱ्यांच्या शेताची पाहणी करून पुढील कार्यवाही केली जाईल.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708
9284321472

# गाढवांच्या लग्नातून पावसाची आस: लोहगावकरांचे वरुणराजाला साकडे



नळदुर्ग (प्रतिनिधी)-पावसाने दडी मारल्याने जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. महिनाभरापासून पावसाची प्रतीक्षा करणाऱ्या तुळजापूर तालुक्यातील लोहगाव येथील शेतकरी व ग्रामस्थांनी वरुणराजाला प्रसन्न करण्यासाठी अनोखा प्रयोग केला. पाऊस पडावा आणि दुष्काळाचे संकट दूर व्हावे, या श्रद्धेतून १० जुलै रोजी गावात चक्क गाढवांचा विवाह सोहळा पार पडला.

या अनोख्या विवाहासाठी एक नर आणि एक मादी गाढव आणण्यात आले. त्यांना अंघोळ घालून हळद लावण्यात आली. कपडे परिधान करून फुलांच्या हारांनी त्यांची सजावट करण्यात आली. सकाळी साडेनऊ वाजता अहिल्यावती नगर येथून या गाढवांच्या जोडप्याची वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक क्रांती चौक, स्वामी गल्ली, कुंभार गल्ली, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर मार्गे महादेव मंदिरापर्यंत नेण्यात आली. या वेळी महिला, तरुण आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महादेव मंदिरासमोर पुरोहितांच्या हस्ते गाढवांची पूजा करण्यात आली. त्यानंतर मंगलाष्टकांच्या स्वरात विवाह सोहळा पार पडला. उपस्थित ग्रामस्थांनी अक्षता टाकून या अनोख्या जोडप्याला आशीर्वाद दिले.

विवाहानंतर क्रांती चौक येथे ग्रामस्थांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली. या आगळ्यावेगळ्या सोहळ्याची चर्चा सध्या लोहगाव परिसरात तसेच सामाजिक माध्यमांवर मोठ्या प्रमाणात होत आहे. यावेळी सरपंच प्रवीण पाटील, राहुल मारेकर, शिवा होटगे, शांतीय्या स्वामी, बिरू बनसोडे, काशिनाथ शिंगाडे, सचिन शिंगाडे, विकास पांढरे, निवृत्ती माने, नामदेव मारेकर, प्रवीण बंडगर, दिगंबर फरताळे, श्रीकांत माने, संतोष कलशेट्टी, सुदर्शन मारेकर, राम बनसोडे, अतुल दबडे, अमोल पाटील, गुरुनाथ शिंगाडे, अभिजीत पाटील, संतोष बिराजदार, बसवराज कलशेट्टी, वाल्मीक पांढरे, रायाप्पा बनसोडे, नेताजी लांडगे, विजयकुमार देशमुख, बबन कुंभार, महेबूब शेख यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संकटावर मात करण्याचा प्रयत्न पाऊस हा ग्रामीण जीवनाचा आधार असल्याने तो लांबल्यास शेतकरी चिंतेत पडतात. अशा वेळी परंपरा आणि श्रद्धेच्या माध्यमातून ग्रामस्थ एकत्र येतात. गाढवांचे लग्न असो किंवा अन्य लोकपरंपरा, या उपक्रमांमागे पाऊस पडावा ही सामूहिक इच्छा आणि संकटाच्या काळात एकजूट टिकवण्याचा प्रयत्न दिसून येतो.

# कळंबच्या वाटेवर वैष्णवांचा मेळा, वारकऱ्यांसाठी नगरपरिषदेकडून सुविधा

कळंब(प्रतिनिधी)-ज्ञानोबा-तुकाराम च्या जयघोषात पंढरीची वाट चालणाऱ्या वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा मानत कळंब नगर परिषद आषाढी वारीसाठी सज्ज झाली आहे. हजारो वारकऱ्यांच्या मुक्कामासह स्वच्छता, पिण्याचे पाणी, प्रकाश व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधांचे यंदा विशेष नियोजन करण्यात आले असून, प्रथमच वारकऱ्यांच्या मुक्कामाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने विदर्भ आणि मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतून लाखो वारकरी पायी पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या वारीतील महत्त्वाचा टप्पा म्हणून कळंब शहराची ओळख आहे.

रुक्मिणीचे माहेर विदर्भात असल्याने त्या भागातील अनेक दिंड्या दरवर्षी कळंबमार्गे पंढरपूरकडे जातात. त्याचबरोबर हिंगोली, नांदेड, परभणी तसेच पालम आणि गंगाखेड परिसरातील वारकरीही कळंबमार्गेच पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करतात. त्यामुळे आषाढी वारीच्या काळात कळंब शहर आणि कळंब-बार्शी राज्यमार्ग वैष्णवांच्या वर्दळीने गजबजून जातो.

प्रथमच वारकऱ्यांच्या मुक्कामाची विशेष व्यवस्था, सर्व सोयींनी युक्त प्रशस्त नाट्यगृहात घेता येईल विसावा आषाढी एकादशीच्या निमित्ताने विदर्भ आणि मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतून लाखो वारकरी पायी पंढरपूरकडे प्रस्थान करतात. यंदा प्रथमच कळंब नगर परिषदेच्या नाट्यगृहात वारकऱ्यांच्या मुक्कामाची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. येथे स्वच्छ अंघोळीची सुविधा, स्वतंत्र स्वच्छतागृहे व स्नानगृहे, शुद्ध फिल्टर केलेले पिण्याचे पाणी तसेच इतर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे सर्व पालखीतयेणाऱ्या हजारो वारकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, नगर परिषदेच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत होत आहे.

# ट्रॅक्टरखाली चिरडून गंभीर जखमी, आरोपींना तातडीने अटक करण्याची नातेवाईकांची मागणी

कळंब/प्रतिनिधी : शिराढोण तांडा येथील मोहन नाथेराम पवार हे ट्रॅक्टरखाली चिरडल्याच्या घटनेत गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर पुण्यातील भारती रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती अद्याप अत्यंत गंभीर असून ते मृत्यूशी झुंज देत असल्याचे नातेवाईकांनी सांगितले आहे. फिर्यादीनुसार, २५ जून रोजी पाडोळी शिवारात शेतातील ट्रॅक्टर बाहेर काढण्याच्या कामादरम्यान वाद झाला. त्यावेळी काही जणांनी ट्रॅक्टर चालवत असताना मोहन नाथेराम पवार यांना धडक दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेत त्यांच्या डोक्यासह शरीराच्या विविध भागांना गंभीर दुखापत झाली. या प्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात FIR क्र. ०१५५/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेला अनेक दिवस उलटूनही आरोपींना अद्याप अटक झालेली नसल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. त्यामुळे आरोपींना तातडीने अटक करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी व प्रकरणाचा निष्पक्ष आणि वेगवान तपास करावा, अशी मागणी ग्रामस्थ व नातेवाईकांनी केली आहे. मोहन नाथेराम पवार यांच्या उपचारासाठी



आतापर्यंत लाखो रुपयांचा खर्च झाला असून पुढील उपचारासाठीही मोठ्या आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. त्यांच्या वडिलांना दिव्यांगत्व असल्याने संपूर्ण कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. शासनाने पीडित कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशीही मागणी करण्यात येत आहे.

# पवनचक्कीचे खांब हटवण्याची मागणी:लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

लोहारा (प्रतिनिधी)-तावशी (ता. लोहारा) येथील वडार समाजाच्या पारंपरिक स्मशानभूमीत पवनचक्की कंपनीकडून खोदकाम करून विद्युत वाहक खांब उभारण्यात आल्याने वाद निर्माण झाला आहे. खोदकामात दफन केलेल्या व्यक्तींच्या अस्थी बाहेर आल्याने समाजाच्या भावना दुखावल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते शाहुराज दंडगुले यांनी शुक्रवारी (दि. १०) लोहारा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. प्रशासनाने घटनास्थळी पंचनामा करून नियमानुसार कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

तावशी गड येथे वडार समाजाची पारंपरिक स्मशानभूमी असून, अनेक पिढ्यांपासून येथे अंत्यसंस्कार केले जात आहेत. या ठिकाणी जेएसडब्ल्यू पवनचक्की कंपनीने खोदकाम करून विद्युत वाहक खांब उभारल्याचा आरोप समाज बांधवांनी केला आहे. या खोदकामामुळे दफन केलेल्या व्यक्तींच्या अस्थी बाहेर आल्याने समाजाच्या भावना दुखावल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. स्मशानभूमीत उभारलेले खांब हटवावेत, स्मशानभूमी अतिक्रमणमुक्त करावी, तसेच ग्रामपंचायतीच्या नमुना आठमध्ये स्मशानभूमीची नोंद घ्यावी, अशा मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या होत्या.

या आंदोलनाला वडार समाजातील युवक व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने पाठिंबा दिला. दरम्यान, लोहारा तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार अनिल अहीरे यांनी शनिवारी (दि. ११) घटनास्थळी जाऊन पंचनामा करून पुढील कारवाई करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर शाहुराज दंडगुले यांनी उपोषण मागे घेतले. यावेळी माकणीचे मंडळ अधिकारी कोकणे, पोलीस अंमलदार महादेव कोळी आदी उपस्थित होते.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649